# महाराष्ट्र विधानपरिषद

## चौथे अधिवेशन, २०१७

---

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**बुधवार, दिनांक २० डिसेंबर, २०१७ / अग्रहायण २९, १९३९ (शके)**

**(१) मुख्यमंत्री**
**(२) गृहनिर्माण मंत्री**
**(३) कामगार, भूकंप पुनर्वसन, कौशल्य विकास, माजी सैनिकांचे कल्याण मंत्री**
**यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ८५**

---

### कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील आरक्षित भूखंडाचा बेकायदेशीर विकास होत असल्याबाबत

**(१) * ३५५२१ श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील कल्याण (पूर्व) परिसरातील सर्व्हे क्र. २०१ या भूखंडावरील आरक्षण क्र.२०३ “बगीचा” या आरक्षणाचा मात्र खाजगी मालकीच्या जागेवर चुकीचा व बेकायदेशीर पध्दतीने होत असलेला विकास व त्याव्दारे शासन निधीचा होत असलेला अपव्यय त्वरित थांबविण्याबाबत सविस्तर निवेदन दिनांक ११ ऑगस्ट, २०१७ व माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री, मा.नगरविकास राज्यमंत्री, प्रधान सचिव, नगरविकास विभाग व प्रधान सचिव, वित्त व नियोजन विभाग यांना आवश्यक त्या कागदपत्रांच्या पुराव्यांसह दिलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निवेदनानुसार व त्यासोबत जोडण्यात आलेल्या कागदपत्रांच्या अनुषंगाने याप्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) मा.लोकप्रतिनिधी यांचे दिनांक ११/८/२०१७ च्या निवेदनामध्ये नमूद मुद्यांबाबत आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांचा अहवाल शासनास प्राप्त झाला असुन, त्यानुसार आ.क्र. २०३-बगीचा या आरक्षित भूखंडावर बांधकाम प्रस्तावित करुन कामाचे आदेश देण्यापुर्वी महानगरपालिकेच्या नगर रचना विभागाचे अभिप्राय घेतलेले नाहीत. शासनाच्या दिनांक ०२/०५/२०१६ च्या अधिसुचनेनूसार १५% बांधकाम अनुज्ञेय आहे. त्यानुसार एका प्रेक्षक गॅलरीचे बांधकाम मर्यादित असुन, दुसऱ्या गॅलरीच्या बांधकामास महानगरपालिकेने स्थगिती दिलेली आहे. यामध्ये नियमानुसार अनुज्ञेय होणारे बांधकामाचे अनुषंगाने योग्य ते फेरबदल करुन महानगरपालिका स्तरावर निर्णय घेण्यात येत आहे.

आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांचा अहवाल विचारात घेऊन प्रकरणी पुढील छाननी शासनस्तरावर करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सेनगाव (जि.हिंगोली) तालुक्यातील जिल्हा न्यायालयाचे बांधकाम व उपविभागीय कार्यालय सुरू करण्याबाबत

**(२) * ३५११९ श्री.रामराव वडकुते :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सेनगाव (जि.हिंगोली) तालुक्यातील जिल्हा न्यायालयाचे बांधकाम १० वर्षापासून अपूर्णावस्थेत आहे तसेच सदर तालुक्यातील उपविभागीय कार्यालय सार्वजनिक बांधकाम विभागाकरिता १५ वर्षापूर्वी जमीन संपादित करण्यात आली असून अद्यापी कार्यालये सुरू झाले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने जिल्हा न्यायालयाचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत तसेच, सेनगाव (जि.हिंगोली) तालुक्यातील उपविभागीय कार्यालय सुरू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) नाही. सेनगाव येथे जागा उपलब्ध नसल्याकारणामुळे न्यायालयीन इमारतीचे बांधकाम अद्‌याप सुरु करता आले नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मे.कंबाटा एव्हीएशन प्रा.लि. कंपनीतील कामगारांची देणी देण्याबाबत

**(३) * ३५७९८ श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्रीमती विद्‌या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग : तारांकित प्रश्न क्रमांक ३१३७१ ला दिनांक ९ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मे.कंबाटा एव्हीएशन प्रा.लि. कंपनीतील ३००० कामगारांची देणी देण्याविषयी अर्थसंकल्पीय अधिवेशनात दिनांक ६ एप्रिल, २०१६ रोजी वा त्यासुमारास विधानपरिषदेत तारांकित प्रश्न / लक्षवेधीच्या माध्यमातून प्रश्न उपस्थित करण्यात आला असून मा.मुख्यमंत्री यांनी कामगारांची देणी तातडीने देण्यात यावीत असे उत्तरात नमुद करुन आश्वासन दिले होते तसेच पावसाळी अधिवेशनात दिनांक ५ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास उपस्थित केलेल्या लक्षवेधी सुचनेवर मा.सभापती महोदयांच्या दालनात सर्व संबधितांच्या तीन बैठका होऊनही अद्‌याप कामगारांची देणी मिळण्यास विलंब होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, २ वर्षाचा कालावधी उलटूनही ३ हजार कर्मचाऱ्यांच्या १५ हजार कुटूंबियांवर उपासमारीची वेळ आलेली असतानाही शासनाकडून कारवाईस विलंब होण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, शासनाकडून कामगारांची देणी देण्याची कार्यवाही किती कालावधीत केली जाणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) अंशत: खरे आहे.

तथापि, राज्य/केंद्र शासनाच्या कामगार विभागाकडून करण्यात आलेल्या संयुक्त प्रयत्नांमुळे व्यवस्थापनाकडून जानेवारी व फेब्रुवारी, २०१६ चे वेतन कामगारांना अदा करण्यात आले आहे. तसेच सदरहू आस्थापनेतील परिणामीत ७२२ कामगारांना विमानतळावरील इतर दोन एजन्सीमध्ये सामावून घेण्यात आले आहे.

(२) मे. कंबाटा एव्हीएशन प्रा.लि. कंपनीतील कामगारांची देणी देण्याच्या अनुषंगाने राज्य/केंद्र शासनाच्या विविध विभागामार्फत कार्यवाही अपेक्षित आहे. या प्रकरणी देणी अदा करण्यास खाली नमुद विविध कारणांमुळे विलंब होत आहे :-

i) मे.कंबाटा एव्हीएशन प्रा.लि. आस्थापनेचे संचालक परदेशात व सीईओ दिल्ली येथे वास्तव्यास आहेत.

ii) या प्रकरणी उचित कार्यवाही करण्यास समुचित शासन हे केंद्र शासन आहे.

iii) मे.कंबाटा एव्हीएशन प्रा. लि. आस्थापनेची निर्विवाद स्थावर मालमत्ता आढळून आलेली नाही.

iv) सदर आस्थापनेच्या संचालकाच्या ट्रस्टच्या स्थावर मालमत्तेबाबत जिल्हाधिकारी, मुंबई यांनी सुरू केलेल्या जप्तीच्या कार्यवाही विरोधात परिणामीत पक्षकारांनी मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल केलेल्या असून, सदर याचिका न्यायप्रविष्ठ आहेत.

v) सदर आस्थापनेच्या जप्त केलेल्या वाहन व यंत्रसामुग्रीबाबत परिणामीत पक्षकारांनी मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल केली असून, सद्य:स्थितीत हया याचिका मा.न्यायालयात प्रलंबित आहेत.

(३) कामगारांचे थकीत वेतन देण्यासंदर्भात उचित कार्यवाही करण्याबाबत मा.केंद्रीय श्रम व रोजगार मंत्री यांना मा.मंत्री (कामगार) यांच्यास्तरावरून विनंती करण्यात आली आहे तसेच कामगार आयुक्त, मुंबई यांनी देखील दिनांक १४/०८/२०१७ रोजीच्या अर्धशासकीय पत्रान्वये केंद्रीय उपमुख्य श्रम आयुक्त, मुंबई यांना त्वरेने उचित कार्यवाही करण्याबाबत कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

# पुणे महापालिकेच्या कार्यालयांना जिओ कंपनीकडून करारानुसार इंटरनेट सेवा दिली जात नसल्याबाबत

**(४) * ३५२४८ श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरात जिओ कंपनीस रस्ते खोदुन ऑप्टीकल केबल टाकण्याच्या बदल्यात करारानुसार जिओ कंपनीकडून महापालिकेच्या १२३ कार्यालयांना २ एमबीपीएसची इंटरनेट सेवा देण्याचे ठरले असताना फक्त ३५ कार्यालयांनाच इंटरनेट सेवा दिली जात असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार महानगरपालिकेशी केलेल्या कराराचा भंग करणाऱ्या जिओ कंपनीवर व त्यास मान्यता देणाऱ्या महानगरपालिका आयुक्तांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) व (३)

- सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ०१/४/२००६ च्या शासन निर्णयानुसार भूमिगत केबल नेटवर्क टाकण्यासाठी शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत परवानगी देण्यात येते.
- सदर शासन निर्णयातील तरतूदीनुसार केबल नेटवर्क कंपनीने २ एमबीपीएसची इंटरनेट सेवा पुणे महानगरपालिकेस नि:शुल्क देणे बंधनकारक आहे. याबाबत माहिती व तंत्रज्ञान विभाग व रिलायन्स जिओ इंन्फोकॉम लि. यांच्यात परस्पर करारनामा झालेला आहे. तथापि, या करार प्रक्रियेत पुणे महानगरपालिकेचा कोणताही सहभाग नाही.
- करारनाम्यातील अटीनुसार महानगरपालिका क्षेत्रातील ५ कि.मी. लांबीसाठी २ एमबीपीएसचे १ कनेक्शन देण्याबाबत नमूद आहे.

- रिलायन्स जिओ कंपनीने एप्रिल, २०१७ अखेर एकूण ६१५ कि.मी. लांबीच्या खोदाईचा प्रस्ताव पुणे महानगरपालिकेस सादर केला असता, एकूण ६१५ कि.मी. लांबीसाठी १२३ कार्यालयांना २ एमबीपीएस कनेक्शन देणेबाबत पुणे महानगरपालिकेने सदर कंपनीस कळविले आहे.
- सदर कंपनीने त्यास अनुसरून हमीपत्र दिलेले आहे.
- तथापि, रिलायन्स जिओ कंपनीने दिनांक ११/०८/२०१७ रोजी पुणे महानगरपालिकेस ३५ कनेक्शन पेक्षा वाढीव कनेक्शन देणे शक्य नसल्याचे कळविले आहे.
- त्यामुळे पुणे महानगरपालिकेने सदर कंपनीस रस्ते खोदाईच्या कोणत्याही परवानगी दिलेल्या नसून महानगरपालिका क्षेत्रात रस्ते खोदाईस प्रतिबंध करण्यात आला आहे.
- महानगरपालिकेच्या १२३ कार्यालयांना २ एमबीपीएस कनेक्शन रिलायन्स जिओ कंपनीकडून उपलब्ध करून घेण्याबाबत पुणे महानगरपालिकेकडून प्रयत्न करण्यात येत आहेत.
- माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने रिलायन्स जिओ इन्फोकॉम या कंपनीस इंटरनेटच्या उर्वरित जोडण्या पुणे महानगरपालिकेस तातडीने देण्यासाठी सूचना दिलेल्या आहेत.
- जिओ इन्फोकॉम या कंपनीने माहिती व तंत्रज्ञान विभागाशी केलेल्या कराराचा भंग केलेला असल्याने सदर कंपनीवर कारवाई करण्याबाबत माहिती व तंत्रज्ञान संचालनालयास कळविण्याची आवश्यक ती कार्यवाही नगर विकास विभागामार्फत करण्यात आली आहे.

-----------------

## राज्यातील धर्मादाय रुग्णालये गरीब रुग्णांना उपचार नाकारत असल्याबाबत

**(५) * ३४८९२ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार, श्री.रामनिवास सिंह, श्री.प्रविण दरेकर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे,**

**श्री.आनंदराव पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.हरिसिंग राठोड, डॉ.सुधीर तांबे, श्री.सुभाष झांबड, श्री.जनार्दन चांदूरकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० अन्वये नोंदणी झालेल्या धर्मादाय रुग्णालयांनी त्यांच्या एकूण खाटांच्या १० टक्के खाटा गरीब रूग्णांकरिता राखीव ठेवणे बंधनकारक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक धर्मादाय रुग्णालये या नियमाचे उल्लंघन करीत असून मुंबईतील विलेपार्ले येथील नानावटी रुग्णालय या धर्मादाय रुग्णालयात धर्मादाय आयुक्त यांनी 'स्टिंग ऑपरेशन' करुन सदर रुग्णालय गरीब रुग्णांवर उपचार नाकारत असल्याची बाब दिनांक १२ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आणली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गरीब रुग्णांवरील उपचारात टाळाटाळ करणे, निर्धन व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील रुग्णांच्या उपचारासाठी असणाऱ्या राखीव खाटा अन्य रुग्णांना देणे इत्यादी कारणांवरून नानावटी रुग्णालयाच्या विश्वस्तांवर गुन्हा दाखल करण्याचे आदेश धर्मादाय आयुक्त यांनी दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील धर्मादाय रुग्णालयांची तपासणी करून नियमांचे उल्लंघन करणाऱ्या व गरीब रुग्णांना उपचार नाकारणाऱ्या रुग्णालयांची मान्यता रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) "रुग्णालयांची मान्यता रद्द करणे" ही बाब या विभागाच्या कार्यकक्षेत येत नाही. तथापि, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी निर्धन व दुर्बल घटकांतील रुग्णांना सार्वजनिक न्यासांमार्फत संचालित धर्मादाय रुग्णालयात मोफत अथवा सवलतीच्या दराने उपचार मिळणेकरीता मंजूर केलेल्या योजनेच्या

अंमलबजावणीत कसूर करणाऱ्या धर्मादाय रुग्णालयांवर महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियमातील तरतूदींनुसार आवश्यक ती कारवाई/ कार्यवाही करण्यात येते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दिवंगत गोपीनाथरावजी मुंडे ऊस तोडणी कामगार कल्याणकारी महामंडळ कार्यान्वित करणेबाबत

**(६) * ३५४९९ श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दिवंगत गोपीनाथरावजी मुंडे ऊस तोडणी कामगार कल्याणकारी महामंडळामार्फत अद्याप एकाही ऊस तोडणी कामगारास मदत मिळाली नसल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त महामंडळाची घोषणा होऊन तीन वर्ष झाले तरी महामंडळाचे कार्यालयही सुरू झालेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर महामंडळामार्फत कोणतीही मदत मिळत नसल्याने राज्यातील लाखो ऊस तोडणी कामगारांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर महामंडळ कार्यान्वित करून ऊस तोडणी कामगारांना मदत करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे आणि त्याबाबत शासनाची भुमिका काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संभाजी पाटील-निलंगेकर :** (१), (२), (३) व (४) हे खरे नाही.

महाराष्ट्र माथाडी हमाल व इतर श्रमजिवी कामगार, (नोकरीचे नियमन व कल्याण) १९६९ च्या तरतूदी नुसार ऊसतोड कामगारांकरीता “रोजगार” अधिनियमाच्या अनुसूची १५ मध्ये अंतर्भुत करणे, अधिनियमाच्या तरतूदी लागू करणे, योजना पुर्वप्रसिध्द करणे याबाबत कार्यवाही करण्यात आली. तसेच दिनांक १६/०८/२०१७ रोजी “लोकनेते गोपीनाथ मुंडे महाराष्ट्र

ऊसतोड व वाहतूक आणि तत्सम श्रमजिवी कामगार मंडळ” गठीत करण्यात आले आहे. तथापि, ऊसतोड कामगारांना आणि त्यांच्या कुटूंबियांना घरबांधणी, वृध्दाश्रम व शैक्षणिक योजना इत्यादी योजनांचा लाभ देण्यासाठी असंघटित कामगार सामाजिक सुरक्षा अधिनियम, २००८ अंतर्गत “लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार सामाजिक सुरक्षा योजना” लागू करण्याचा शासनाने नव्याने निर्णय घेतला असून त्याबाबत पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील कारागृहांची दुरवस्था झाल्याबाबत

**(७) * ३५८८६ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ९ मध्यवर्ती कारागृह, ३१ जिल्हा कारागृह, १३ खुले कारागृह व १७२ उप कारागृह असून पुणे व मुंबई येथे महिलांकरिता स्वतंत्र कारागृह असून या कारागृहांमध्ये क्षमतेपेक्षा अधिक कैदी ठेवले जात असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील कारागृहात १० ते १५ कैद्यांची क्षमता असलेल्या बराकात ३५ ते ४० कैदी ठेवण्यात येत असून या बराकाची दुरवस्था झाली असून तडे गेलेल्या भिंती, गळणारे छप्पर, सांडपाण्याचा निचरा होवू न शकल्याने तुंबलेली स्वच्छतागृहे त्यामुळे कैद्यांना अनेक संसर्गजन्य रोग जडल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कल्याण (जि.ठाणे) येथील आधारवाडी कारागृहात क्षमतेपेक्षा तिप्पट कैदी ठेवण्यात आले असून कैद्यांना ठेवण्यात आलेले बराक अतिशय जीर्ण झाले असून स्वच्छतागृहाची दुरवस्था झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून राज्यातील सर्व कारागृहांचे सर्वेक्षण केले आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार राज्यातील कारागृहांची दुरुस्ती करणेबाबत तसेच नवीन कारागृह बांधणेबाबत व कारागृहातील कैद्यांना आहार व अन्य आवश्यक सोयीसुविधा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे अंशत: खरे आहे.

(४) मा.उच्च न्यायालय, मुंबई यंथे दाखल झालेल्या जनहित याचिका क्र. ४६/२०१५ सह १६७/१५ च्या अनुषंगाने कारागृहात अद्ययावत सुधारणा करण्यासाठी से.नि.न्या. डॉ.राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. राज्यातील कारागृहातील शौचालय/स्नानगृहे यांची दुरुस्ती व नवीन बांधकामे याबाबत आढावा घेण्यात आला असून, त्याकरीता पुरवणी मागणीव्दारे अतिरिक्त रुपये २० कोटी इतके अनुदान मंजूर करण्यात आले आहे. कामाच्या प्रगतीचा आढावा वरिष्ठ पातळीवर वेळोवेळी घेतला जात आहे. राज्यातील कारागृहातील कैद्यांना आहार व अन्य आवश्यक सोयी सुविधेबाबत शासन अधिसूचना दिनांक २४/०५/२००५ नुसार स्त्री व पुरुष भारतीय व परदेशी न्यायाधीन व सिध्ददोष बंद्यांना द्यावयाच्या आहाराचे सुधारित प्रमाण निश्चित केले आहे. त्यानुसार बंद्यांना आहार दिला जातो. तसेच, शासन अधिसूचना दिनांक ०७/०२/२००७ नुसार ०१ ते ०४ वर्षाच्या मुलांचे आहाराचे सुधारित प्रमाण निश्चित केले आहे. त्याचप्रमाणे लहान मुलांना दिलेल्या परिमाणानुसार आहार दिला जातो. तसेच कारागृहातील कैद्यांना पुरविण्यात येणाऱ्या आहार व स्वच्छतेबाबत अचानक कारागृहात भेट देऊन, तपासणी करण्याकरीता आहार तज्ञ व समाजसेवक यांची सर्व कारागृहात समिती गठीत करण्यात आली आहे. त्यानुषंगाने कार्यवाही चालू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे मुंबई येथील आंतरराष्ट्रीय स्मारकाबाबत

**(८) * ३४९२९ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील दादर येथील इंदू मिलच्या जागेवर भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या भव्य स्मारकाचे भूमीपूजन दिनांक ११ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास मा.पंतप्रधान महोदयांचे शुभहस्ते करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्मारकाचे भूमीपूजन होऊन २ वर्षापेक्षा अधिक कालावधी होऊनही काम अद्याप सुरु करण्यात आले नसल्याचे तसेच स्मारकाच्या कामास विलंब लागत असल्यामुळे स्मारकाचा खर्च १६६ कोटी रुपयांनी वाढला असल्याचे दिनांक १८ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त स्मारक किती क्षेत्रावर उभारण्यात येणार आहे व यासाठी प्रत्यक्षात किती निधी उपलब्ध करण्यात आला आहे व बांधकामासंदर्भातील सद्यःस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) अशी बाब नाही.

(३) व (४) प्रस्तावित भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक इंदू मिलच्या ४.८४ हेक्टर जागेवर उभारण्यात येणार आहे. यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने रुपये ६०० कोटी इतक्या अंदाजित रक्कमेस प्रशासकिय मान्यता दिली आहे. सदर खर्च सुरुवातीस प्राधिकरणामार्फत करण्यात येणार आहे. सदर स्मारकाच्या बांधकामाकरिता रचना व बांधणे या तत्त्वावर निविदा मागविण्यात आल्या आहेत. निविदेसंबंधी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पात्र सुयोग्य कंत्राटदारास बांधकामाचे काम बहाल करण्यात येईल.

-----------------

## मुंबई महानगरपालिकेने प्रस्तावित केलेल्या सागरी किनारा रस्त्याबाबत

**(९) * ३४६७१ श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.अनिल भोसले : दिनांक ३० मार्च, २०१७ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ५ मधील प्रश्न क्रमांक २३७२३ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेने प्रस्तावित केलेला नरिमन पॉईंट ते कांदिवली हा ३५ कि.मी. लांबीचा सागरी किनारा रस्त्याचा विस्तार ठाणे पर्यंत करण्यात येणार असून सदर विस्तारीत मार्ग मार्वे, भाईंदर, घोडबंदर पर्यंत करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याच्या प्रकल्प अहवालासाठी सल्लागारांची नियुक्ती केली आहे काय व उक्त रस्त्यासाठी किती खर्च येणार आहे,

(३) असल्यास, सदर रस्त्याचे काम केव्हा सुरु करण्यात येणार आहे व ते किती कालावधीत पूर्ण होणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) प्रस्तावित नरिमन पॉईंट ते कांदिवली या सागरी मार्गाची प्रिन्सेस स्ट्रीट फ्लायओव्हर ते वरळी (end of Sea Link) भाग-अे व बांद्रा (end of Sea Link) ते कांदिवली जंक्शन लिंक रोड भाग-बी या दोन भागामध्ये विभागणी करण्यात आलेली असून भाग-अे संदर्भात पर्यावरण विभागाची मान्यता प्राप्त झालेली असून महानगरपालिकेकडून निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यामध्ये आहे. भाग-बी बाबतही या अनुषंगाने पुढील कार्यवाही सुरु आहे. तथापि सागरी महामार्गाचे विस्ताराचे अनुषंगाने सद्य:स्थितीमध्ये बृहन्मुंबई महानगरपालिका व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांचेकडून कार्यवाही सुरु नाही.

(२) ते (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोलापूर शहरातील महापालिकेचे देगाव येथील आरोग्य केंद्र सुरु करण्याबाबत

**(१०) * ३५६३१ श्री.जयंत पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहरातील प्रभाग क्र. ६ मधील देगांव येथे महापालिकेकडून शासनाच्या योजनेतून सुमारे ६० लाख रुपये खर्चून मिनी आरोग्य केंद्राची इमारत उभारण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बिंदू नामावलीनुसार सदर मिनी आरोग्य केंद्रामध्ये पदे भरण्याचे आदेश शासनाने दिलेले असूनही अद्याप पदे भरण्यात आलेली नाहीत, तसेच फर्निचर अभावी सदर आरोग्य केंद्र अनेक महिन्यांपासून बंद असल्याने सदर इमारतीत जुगार आणि गैरप्रकार सुरु झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन सदर आरोग्य केंद्र सुरु करण्याबाबत व येथील गैरप्रकार थांबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत प्राप्त निधीतून सदर इमारत उभारण्यात आली आहे.

(२) देगांव आरोग्य केंद्रामध्ये बिंदू नामावलीनुसार पदे भरण्यासाठी शासनाने दिलेल्या निर्देशानुसार कर्मचारी वर्ग निवड समितीमार्फत वैद्यकिय अधिकारी, स्टाफ नर्स (जी.एन.एम.), ए.एन.एम., फार्मासिस्ट व लॅब टेक्नीशियन ही पदे भरण्यात आली आहेत.

शासनाकडून प्राप्त झालेला निधी महानगरपालिकेकडे शिल्लक असून त्या निधीतून फर्निचर खरेदीस मंजूरीचा प्रस्ताव आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान तथा संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान महाराष्ट्र, मुंबई यांना सादर केला आहे.

आरोग्य केंद्रामध्ये ये - जा करण्याकरिता असलेले सर्व मार्ग बंदिस्त करण्यात आले आहेत. तेथे जुगार अथवा इतर गैरप्रकार झाल्याचे किंवा कुलूप तोडून आत प्रवेश केल्याचे निदर्शनास आलेले नाही.
(३) माहे डिसेंबर, २०१७ मध्ये आरोग्य केंद्र सुरू करण्याचे महानगरपालिकेचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील मान्यता प्राप्त अधिकृत प्राथमिक व माध्यमिक शाळांची अनधिकृत बांधकामे नियमित करण्याबाबत

**(११) * ३५२३६ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील मान्यता प्राप्त अधिकृत प्राथमिक व माध्यमिक शाळांची अनधिकृत बांधकामे आणि या शाळांच्या वापरात व ताब्यात असलेल्या जागा नियमित करण्याची आवश्यकता असल्याने अशा सर्व जागांना नव्या विकास आराखडयात (डीपी) शैक्षणिक आरक्षण मिळावे अशी मागणी विविध शिक्षण संस्थांनी आणि लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शाळा व शिक्षण संस्थांच्या ताब्यातील व वापरातील जागांवर शैक्षणिक आरक्षण जाहिर करुन त्यांना चार एफएसआय (पैकी दोन एफएसआय विक्री योग्य) देण्याचा शासनाचा विचार आहे काय,
(३) असल्यास, याबाबतचे शासनाचे धोरण काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) ते (४) बृहन्मुंबई क्षेत्राची प्रारुप सुधारित विकास योजना महानगरपालिकेकडून प्रसिध्द झालेली असून शासनास मंजूरीसाठी सादर होण्याच्या टप्प्यामध्ये सीआरझेड क्षेत्र वगळता अशा शाळांचे नियोजन सुधारित प्रारुप विकास योजनेमध्ये दर्शवावे अशा सूचना आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना देणेत आलेल्या होत्या. सदर सुधारित प्रारुप विकास योजना महानगरपालिकेकडून शासनास दिनांक २/८/२०१७ रोजी मंजूरीसाठी सादर करण्यात आलेली आहे. सदर योजनेच्या छाननी प्रकियेमध्ये सदर बाब शासनाकडून पडताळणेत येईल.

बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावलीतील तरतूदीनुसार शैक्षणिक प्रयोजनार्थ असलेल्या स्वतंत्र भूखंडामध्ये शैक्षणिक कारणासाठी ३०० टक्के इतका अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक उपलब्ध आहे. झोपडपट्टी पुनवर्सन योजनेंतर्गत शाळा व त्यालगतचा भूखंड हा पुनवर्सन योजनेपासून स्वतंत्र दर्शविता येत नसल्याने विद्यमान शाळेचे क्षेत्र व विकास नियंत्रण नियमावलीनुसार किमान आवश्यक क्षेत्र यामधील कमाल क्षेत्र पुनर्विकासासाठी अनुज्ञेय रहाणार आहे.

-----------------

## नाशिक शहरात हिट ॲण्ड रन प्रकारच्या अपघातांच्या संख्येत वाढ झाल्याबाबत

**(१२) * ३५१८१ डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरात हिट ॲण्ड रन प्रकारच्या अपघातांच्या संख्येत वाढ होत असून शहरात माहे जानेवारी ते जुलै, २०१७ या सात महिन्यांच्या कालावधीत झालेल्या ४०९ अपघातांपैकी ११२ अपघात हे हिट ॲण्ड रन प्रकारातील असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाहन चालकास अथवा पादचाऱ्यास जखमी करून पळून जाणे, याप्रकारामुळे अनेकदा जखमी व्यक्तींना आपला जीव गमवावा लागत असून शहरात रस्ते अपघातात दरवर्षी सुमारे दोनशेहून अधिक व्यक्तींचा बळी जात असल्याचे दिनांक १८ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शहरातील हायवे, रिंग रोड, हमरस्ते आणि कॉलनी रस्ते अशा सर्वच ठिकाणी तसेच कमी रहदारी असलेल्या रस्त्यांवर हिट ॲण्ड रन अपघाताचे प्रमाण वाढत असल्याने जनतेत चिंतेचे वातावरण पसरले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त अपघात प्रकारांना आळा घालण्यासाठी पोलिसांकडून प्रभावी, प्रतिबंधात्मक उपाययोजना केली जावी अशी नाशिक मधील नागरिकांकडून मागणी केली जात असल्याचे पार्श्वभुमीवर शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे.

जानेवारी ते जुलै, २०१७ या कालावधीत ४०९ अपघातांपैकी ११२ अपघात हे हिट अँड रन चे आहेत. तथापि, गतवर्षीच्या तुलनेत एकूण अपघात व हिट अँड रन च्या अपघातांच्या संख्येत घट झाली आहे.
(२) नाशिक शहरात सन २०१५ मध्ये २३४, सन २०१६ मध्ये २१३ व सप्टेंबर, २०१७ पर्यंत १२९ व्यक्ती रस्ते अपघातामध्ये मयत झाल्या आहेत.
(३) हे खरे नाही.
(४) नाशिक शहरातील शाळा, कॉलेज, औदयोगिक क्षेत्रामध्ये वाहतूक नियमांबाबत प्रबोधन करण्यात येवून मै हूं DON (Dost of Nashik), छोटा पोलीस, प्रत्येक सोमवारी नो हॉर्न डे इ. संकल्पना राबविण्यात आल्या आहेत. मदयप्राशन करून वाहन चालविणाऱ्या वाहनचालक, मोबाईल फोनवर बोलणारे वाहनचालक, वाहतूक नियमांचे पालन न करणारे वाहनचालक, विरूध्द दिशेने वाहन चालविणारे वाहनचालक, हेडलाईट/ब्रेकलाईट किंवा टेल लाईट नसलेले वाहनचालक, सिग्नल जंप करून वाहन चालविणारे वाहनचालक यांच्यावर कारवाई करून दंड वसूल करण्यात आला आहे. शहरातील सिग्नलचा अभ्यास करून सकाळी व दुपारी कमी गर्दीच्या वेळी सिग्नलच्या सर्कल टाईमिंग मध्ये बदल करण्यात आले आहेत. नो पर्किंग झोन मध्ये लावण्यात येणाऱ्या वाहनांवर तसेच अवैध वाहतूक करणाऱ्या वाहनचालकांवर कारवाई करण्यात आली आहे.
(५) विलंब झालेला नाही.

-----------------

## मुंबईत एसआरए प्रकल्प रखडविणाऱ्या विकासकांवर कारवाई करण्याबाबत

**(१३) * ३५९१९ आर्कि.अनंत गाडगीळ : तारांकित प्रश्न क्रमांक ३२६७५ ला दिनांक २६ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत एसआरए प्रकल्प रखडवणाऱ्या ४२ विकासकांच्या एसआरए प्रकल्पांच्या परवानग्या रद्द करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईत अजून किमान १०० एसआरए प्रकल्प विकासकांच्या चुकारपणामुळे रखडले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने आढावा घेऊन झोपडपट्टीवासियांना हक्काच्या घरापासून वंचित ठेवणाऱ्या विकासकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश महेता :** (१) माहे जून, २०१७ अखेर महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि. व पु.) अधिनियम १९७१ च्या कलम १३(२) अन्वये एस.आर.ए. प्रकल्प रखडवणाऱ्या ४२ योजनांचे विकासकांच्या नियुक्त्या रद्द करण्यात आल्या आहेत. त्यानंतर नोव्हेंबर, २०१७ अखेर १२ योजनांचे विकासकांच्या अशा एकूण ५४ योजनांचे विकासकांच्या नियुक्त्या रद्द करण्यात आल्या आहेत.

(२), (३) व (४) मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी प्रलंबित योजनांचा व्यापक आढावा घेतला असून वर नमूद १३(२) कलमांतर्गत एकूण १२२ एस.आर.ए. योजनांच्या विकासकांना नोटीसा बजावून खुलासा मागविण्यात आलेला आहे. त्यापैकी समाधानकारक खुलासा सादर न केलेल्या विकासकांविरुध्द कारवाई करण्यासाठी सुनावणीची प्रक्रिया सुरु आहे.

-----------------

## राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या विद्यावेतनात वाढ करण्याबाबत

**(१४) * ३५१२९ श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, श्री.दत्तात्रय सावंत, श्रीमती स्मिता वाघ, श्री.आनंदराव पाटील, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अमरनाथ राजूरकर, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.सुभाष झांबड, श्री.जनार्दन चांदूरकर : तारांकित प्रश्न क्रमांक ३३५४४ ला दिनांक २ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये (आय.टी.आय.) शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना गत अनेक वर्षापासून केवळ रुपये चाळीस विद्यावेतन देण्यात येत असून विद्यावेतनात वाढ करण्याचा शासनस्तरावर विचाराधीन असलेल्या प्रस्तावावर विचार पूर्ण झाला आहे काय,

(२) असल्यास, सध्याच्या महागाईच्या काळात सदर विद्यावेतन अतिअल्प असल्याने विदयार्थ्यांकडून विद्यावेतनात वाढ करण्याची मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनस्तरावर विचाराधीन असलेल्या प्रस्तावावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संभाजी पाटील-निलंगेकर :** (१), (२), (३) व (४) औद्योगिक प्रशिक्षण संस्थांतील एकूण प्रशिक्षणार्थ्यांपैकी आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्या प्रशिक्षणार्थ्यांना दरमहा रुपये ४०/- तसेच मागासवर्गीय प्रशिक्षणार्थ्यांना दरमहा रुपये ६०/- याप्रमाणे विद्यावेतन देण्यात येते. सदर विद्यावेतनामध्ये वाढ करण्याची मागणी विद्यार्थ्यांकडून करण्यात येते हे खरे आहे. त्यानुषंगाने औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे विद्यावेतन वाढ करण्याचा प्रस्ताव अद्यापि शासनाच्या विचाराधीन आहे.

-----------------

## बी.डी.डी. चाळींच्या पुनर्विकासाबाबत

**(१५) * ३४७८७ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ३१३८४ ला दिनांक २ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरळी, नायगांव, ना.म.जोशी मार्ग व शिवडी येथील बी.डी.डी. चाळींच्या पुनर्विकासाबाबत निविदा काढण्याची अंतिम प्रक्रिया सुरु झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वरळी येथील बी.डी.डी. चाळींच्या पुनर्विकासाच्या निविदा कोणत्या विकासकाला देण्यात आल्या आहेत व शिवडी येथील बी.पी.टी.च्या जागेवर असलेल्या बी.डी.डी. चाळींच्या पुनर्विकासाबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने बी.पी.टी.ची जमीन पुनर्विकास प्रकल्पासाठी मिळावी यासाठी शासनाने केंद्र शासनाकडे पाठविलेल्या प्रस्तावास मंजूरी प्राप्त झाली आहे काय व त्यानुषंगाने कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश महेता :** (१) नायगांव व ना.म.जोशी मार्ग येथील बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पाच्या बांधकामासाठी निविदा कार्यवाही पूर्ण करुन बांधकाम कंत्राटदाराची नियुक्ती एप्रिल, २०१७ मध्ये करण्यात आली आहे. वरळी बी.डी.डी. चाळ पुनर्विकास प्रकल्पाबाबतची निविदा कार्यवाही या संदर्भात दाखल झालेल्या न्यायालयीन प्रकरणामुळे प्रलंबित आहे.

शिवडी बीडीडी चाळींखालील जमीन ही मुंबई पोर्ट ट्रस्ट यांच्या मालकीची असल्याने व राज्य शासनाकडे हस्तांतरीत न झाल्याने पुनर्विकासाबाबत पुढील प्रक्रिया सुरु होऊ शकली नाही.

(२) वरळी बी.डी.डी. चाळ पुनर्विकासाच्या निविदा तीन निविदा धारकांनी भरलेल्या असून या संदर्भात दाखल झालेल्या न्यायालयीन प्रकरणामुळे ही निविदा प्रक्रिया प्रलंबित आहे.

शिवडी येथील बीडीडी चाळींची जागा मुंबई पोर्ट ट्रस्ट यांच्या मालकीची असल्याने ती जागा प्रथम महाराष्ट्र शासनाच्या नावे करण्याच्या अनुषंगाने मुख्य सचिव यांचेस्तरावरुन दिनांक २७/०१/२०१७ च्या पत्रान्वये सचिव, जहाज मंत्रालय, भारत सरकार व अध्यक्ष, मुंबई पोर्ट ट्रस्ट यांना विनंती करण्यात आलेली आहे. तद्नंतर अध्यक्ष, मुंबई पोर्ट ट्रस्ट यांनी दिनांक २३/०३/२०१७ च्या पत्रान्वये शिवडी येथील मुंबई पोर्ट ट्रस्टच्या जागेवर असलेल्या बी.डी.डी. चाळींचा पुनर्विकासाचा प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर या प्रकरणी निर्णय घेण्यात येईल असे कळविले आहे. या अनुषंगाने म्हाडा व मुंबई पोर्ट ट्रस्ट यांच्यामध्ये झालेल्या एका बैठकीमध्ये झालेल्या निर्णयानुसार, म्हाडाने या संदर्भात Feasibility Report (सुसाध्यता अहवाल) दिनांक १३/११/२०१७ रोजी सादर केला आहे. सदर सुसाध्यता अहवाल मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील शक्ती प्रदत्त समितीसमोर ठेवण्याचे निर्देश मा.मुख्य सचिव यांनी दिनांक ०६/१२/२०१७ रोजी दिले आहेत व त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## येवला (जि.नाशिक) नगरपालिका क्षेत्रातील पर्यटनस्थळास मुलभूत सोयी सुविधा पुरविणेबाबत

**(१६) * ३४८४६ श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला (जि.नाशिक) नगरपालिका क्षेत्रातील "क" वर्गीय पर्यटनस्थळ असलेल्या राजे राघुजीबाबा स्मारक या ठिकाणी येणाऱ्या पर्यटक व यात्रेकरुंना पुरेशा नागरी व मुलभूत सोयी सुविधांसाठी निधी मिळण्याकरिता शासनाकडे प्रस्ताव पाठविण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ८ मार्च, २०१७ रोजी वा त्यासुमारास मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने सदर पर्यटन स्थळासाठी निधी मिळण्याकरिता माहे ऑक्टोबर, २०१७ पर्यंत शासनाकडे प्रस्ताव सादर झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (२) मधील विलंबाबाबत शासनाकडून चौकशी करून संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, या आशयाचे निवेदन जिल्हाधिकारी, नाशिक यांचेकडे प्राप्त झाले आहे.

(२) व (३) सदर निवेदनाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, नाशिक यांनी येवला नगरपरिषदेस अंदाजपत्रकासहीत परिपुर्ण प्रस्ताव सादर करण्याबाबत कळविले आहे. नगरपरिषदस्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर येथील मध्यवर्ती कारागृहात कैद्यांचा संशयास्पद मृत्यू झाल्याबाबत

**(१७) * ३५१५७ अॅड.जयदेव गायकवाड, श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, अॅड.निरंजन डावखरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.आनंद ठाकूर, अॅड.राहुल नार्वेकर, श्री.अनिल भोसले, श्री.प्रकाश गजभिये, श्री.ख्वाजा बेग, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील मध्यवर्ती कारागृहात माहे फेब्रुवारी, २०१४ ते माहे जुलै, २०१७ या कालावधीत ३२ कैद्यांचा संशयास्पद मृत्यू झाल्याची बाब निदर्शनास आली असून यातील बहुतांश कैद्यांच्या मृत्यूचे कारण अजूनही स्पष्ट करणारी माहिती तुरुंग प्रशासनाकडून देण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर येथील बहुचर्चित कुश कटारिया हत्याकांडातील प्रमुख आरोपी आयुब पुगालियाची नागपूर मध्यवर्ती कारागृहातच एका कैदाने हत्या केल्याची घटना माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान घडली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तदनुसार जबाबदार असणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर व आरोपींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच असे प्रकार पुन्हा घडू नये याकरिता कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, कारागृहात मृत्यू पावलेल्या कैद्यांच्या कुटुंबियांना/वारसांना शासनाने अर्थसहाय्य केले आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही,

नागपूर मध्यवर्ती कारागृहामध्ये माहे फेब्रुवारी, २०१४ ते जुलै, २०१७ या कालावधीत ३२ कैद्यांचा संशयास्पद मृत्यू झाला नसून सदरच्या बंदयाचा मृत्यू शासकीय महाविद्यालय व रुग्णालय/कारागृह रुग्णालय, नागपूर येथे उपचारादरम्यान झालेला आहे.

संबंधित पोलीस स्टेशन येथे प्रत्येक बंदी मृत्यूबाबत अेडीआर (आकस्मीक मृत्यू) ची नोंद करण्यात आली आहे.

बंदयाच्या मृत्यूची खबर मा.राष्ट्रीय/राज्य मानवी हक्क आयोग, शासन व इतर वरिष्ठ कार्यालय तसेच संबंधित न्यायालय यांना कळविण्यात आली आहे. त्याचप्रमाणे मा.कार्यकारी दंडाधिकारी/मा.मुख्य न्यायदंडाधिकारी यांचेमार्फत इन्क्वेस्ट पंचनामा करण्यात आल्यानंतर मृत बंदयाच्या मृत्यूबाबतची चौकशी जिल्हा दंडाधिकारी व मा.न्यायदंडाधिकारी यांचेमार्फत करण्यात येते. तसेच मृत बंदयाचे पी.एम. रिर्पोट तसेच मृत्यूबाबतचे अंतिम कारणबाबतचा अहवाल न्याय वैद्यकशास्त्र विभाग, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर यांचेकडून परस्पर जिल्हा दंडाधिकारी व मा.न्यायदंडाधिकारी यांना सादर केले जातात तसेच बंदी मृत्यू चौकशीचा अहवाल जिल्हादंडाधिकारी/न्यायदंडाधिकारी यांचेमार्फत मा.राष्ट्रीय/राज्य मानवी हक्क आयोग यांना सादर केले जात असून या कार्यालयास प्रत दिली जाते.

सदर कालावधीत मृत पावलेल्या बंदयापैकी १० बंदयाचा उपचारादरम्यान नैसर्गिक मृत्यू झाल्याचा जिल्हादंडाधिकारी यांचा चौकशी अहवाल कारागृहास प्राप्त झालेला असून उर्वरित बंदयांच्या मृत्यूबाबत चौकशी सुरु आहे.

(२) व (३) होय, हे खरे आहे,

सदरहू हत्याप्रकरणी शिक्षा बंदी क्रमांक सी-९२०० सुरज विशेषराव कोटनाके याने गुन्हयाची कबुली दिल्याने त्याचेवर धंतोली पोलीस स्टेशन अप क्र. ३००/१७, कलम ३०२, २०१ भा.दं.वि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस स्टेशन, धंतोली यांचेमार्फत सुरु आहे. तसेच शिक्षाबंदी क्र. ९२०० सुरज विशेषराव कोटनाके यास शिस्तभंग कारणास्तव रत्नागिरी विशेष कारागृह येथे कायमस्वरुपी वर्ग करण्यात आले आहे.

सदर घटनेच्या चौकशी दरम्यान कर्तव्यात कसूर केलेल्या संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित आहे.

अशा स्वरुपाच्या घटनांची पुनरावृत्ती होऊ नये याकरीता भांडखोर, खुनशी व आपसात वैमनस्य असलेल्या बंदयांची ओळख पटवून त्यांचेवर लक्ष ठेवणे, इतर बंदयांपासून वेगळे ठेवणे, कारागृहात नियमित व वेळोवेळी झडत्या घेणे, कारागृह परिसरातून अर्धवट तुटलेल्या फरश्या, दगडगोटे, विटा हलविणे व जेवण वाटप, भत्त्याचे डबे, टापे तसेच चमचे व तुटलेल्या पत्र्यांचा गैरवापर होणार नाही याबाबत विशेष दक्षता घेणेबाबत कारागृह अधिक्षक व इतर अधिकाऱ्यांना निर्देश दिले आहेत.

तसेच, कारागृह प्रशासनामार्फत सेल्फ हेल्प ग्रुप स्थापन करणे व Operation Tracking नावाने एक मोहिम हाती घेऊन असामान्य वर्तणूक/आत्महत्या प्रवण/हिंसक वृत्तीचे बंद्याचा शोध घेऊन त्यांच्यावर कडक निगराणी ठेऊन योग्य ते समुपदेशन व आवश्यकतेनुसार वैद्यकीय उपचार करण्यात येत आहेत. तसेच नागपूर मध्यवर्ती कारागृहामधील प्रत्येक विभागात सेल्फ हेल्प ग्रुप तयार करण्यात आला असून कारागृह शिस्तीचे/नियमाचे पालन करणारे, कारागृहात चांगली वर्तणूक असणारे, प्रशासनास मदत करुन त्यांचे स्वत:चे मनोबल, मनोधैर्य चांगले आहे अशा बंद्याची निवड करण्यात आली असून त्यांचेव्दारे कारागृहात घडणाऱ्या तसेच बंदी आत्महत्येसंदर्भात धोकादायक/त्रस्त बंद्याबाबतची माहिती वेळीच प्राप्त होण्यास मदत होत आहे.

(४) कोणतेही अर्थसहाय्य देण्यात आलेले नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पवनी (जि.भंडारा) नगरपरिषद मुख्याधिकारी यांनी कार्यक्षेत्राच्या मर्यादांचा भंग केल्याने त्यांना निलंबित करणेबाबत

**(१८) * ३५५४५ श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पवनी (जि.भंडारा) नगरपरिषद मुख्याधिकारी कु.माधुरी मडावी यांनी स्वच्छ भारत व स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत गुड मॉर्निंग पथकातील शिक्षकांना दिनांक ०४ व ०५ जुलै, २०१७ रोजी अशैक्षणिक कामाकरिता नियुक्त करून या पथकातील शिक्षकांवर देखरेख करण्यासाठी सफाई कामगाराची निरीक्षक म्हणून नेमणुक केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षकांनी ही अशैक्षणिक कामे करण्यास नकार दिल्यास किंवा दुर्लक्ष केल्यास त्यांच्याविरूध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्याची नोटीस मुख्याधिकाऱ्यांनी दिनांक १४ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास पाठविली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या बेजबाबदार कार्यशैलीबाबत व कार्यक्षेत्राच्या मर्यादांचा भंग केल्याबाबत उक्त नगरपरिषद मुख्याधिकारी यांना निलंबित करण्याची मागणी नागपूर विभागाच्या लोकप्रतिनिधींनी दिनांक २१ जुलै, २०१७ व दिनांक ०४ ऑक्टोबर, २०१७ रोजी शासनास पत्र पाठवून केली होती, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस** : (१) नगरपरिषदेमध्ये पुरेसे कार्यालयीन कर्मचारी उपलब्ध नसल्याने स्वच्छ भारत व स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत स्थापन केलेल्या गुड मॉर्निंग पथकामध्ये नगरपरिषद शाळांमधील शिक्षकांच्या नियुक्त्या करण्यात आल्या होत्या. दिनांक ४ व ५ जुलै, २०१७ रोजी त्यांनी काम केले. तथापि, त्यानंतर त्यांनी व संघटनेने या कामातून मुक्त करण्याची विनंती मुख्याधिकारी यांना केल्यावर दिनांक ६ जुलै, २०१७ पासुन त्यांना पथकातुन कार्यमुक्त केले आहे.

पथकातील शिक्षकांवर देखरेखीसाठी सफाई कामगाराची नियुक्ती केली होती हे खरे नाही. शिक्षकांची ५ पथके स्थापन करण्यात आली होती या प्रत्येक पथकांचे प्रमुख हे शिक्षकच होते, ज्यांची ज्येष्ठतेनुसार नियुक्ती केली होती. पाचही पथकांच्या कामात समन्वय व देखरेखीसाठी श्री.बोंदरे, कनिष्ठ अभियंता (विद्‌युत) यांची नियुक्ती करण्यात आली होती.

(२) संबंधित शिक्षकांनी ही अशैक्षणिक कामे करण्यास नकार दिल्यास किंवा दुर्लक्ष केल्यास त्यांच्याविरूध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्याची नोटीस मुख्याधिकाऱ्यांनी दिनांक १४ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास पाठविली असल्याचे दिसून येत नाही.

(३) हे खरे आहे.

सन्माननीय लोकप्रतिनिधींची दिनांक १४/०७/२०१७ व ०४/१०/२०१७ ची पत्रे प्राप्त झाली आहेत.

(४) या संदर्भात चौकशी करून अहवाल शासनास सादर करण्यास जिल्हाधिकारी, भंडारा यांना दिनांक २/१२/२०१७ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना टॅब पुरविण्याबाबत

**(१९) * ३५६५१ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील, श्री.हरिसिंग राठोड, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमधील इयत्ता नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांना सन २०१७-१८ चे शैक्षणिक वर्ष सुरु होऊन तीन महिन्यांचा कालावधी झाला तरीही टॅब मिळाले नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, टॅबच्या खरेदीसाठी या अर्थसंकल्पात प्राथमिक शाळांसाठी पाच कोटी तर माध्यमिक शाळांसाठी २.८३ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, इयत्ता नववीच्या पाठ्यक्रमात सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षासाठी बदल झाला असल्याने टॅब खरेदीची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली नाही तसेच अनेक शाळांमध्ये मेमरी कार्ड विना टॅब पडून आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदर विद्यार्थ्यांना टॅब देण्याबाबत व मेमरी कार्डविना पडून असलेल्या टॅबला मेमरीकार्ड पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) "टॅब" ची प्रतीक्षाच अशा आशयाची बातमी दिनांक १७/११/२०१७ रोजीच्या महाराष्ट्र टाईम्स या वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली होती ही वस्तुस्थिती आहे.
(२) हे खरे आहे.
(३), (४) व (५) सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षामध्ये इयत्ता ९ वी च्या पाठ्यक्रमात बदल झाल्यामुळे, सदर टॅबचा वापर इयत्ता ९ वी तील विद्यार्थ्यांसाठी करणे बृहन्मुंबई महानगरपालिकेस शक्य झाले नाही.

सन २०१७-१८ मध्ये इयत्ता ९ वी मधील विद्यार्थ्यांसाठी १८,०७८ टॅब खरेदीसाठी दिनांक ०५/०७/२०१७ रोजी मागविण्यात आलेल्या निविदेस दिनांक ११/०९/२०१७ रोजी चार वेळा मुदतवाढ दिल्यानंतर दोन निविदाकारांकडून प्रतिसाद मिळाला.

सदर निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत इयत्ता ९ वी तील विद्यार्थ्यांना नवीन पाठयक्रम अंतर्भुत असलेले टॅब उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत.

तसेच, सन २०१५-१६ व सन २०१६-१७ मध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत शालेय विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या एकूण ४३,८४३ टॅबमधील ३६०० मेमरी कार्डस शालेय विद्यार्थ्यांकडून गहाळ झालेली असल्याने ३६०० टॅब मेमरी कार्डविना बंद अवस्थेत पडून होते ही वस्तुस्थिती आहे.

सदर ३६०० मेमरी कार्डस खरेदी करण्याची निविदा प्रक्रिया सुरु आहे.

-----------------

## मुलुंड (मुंबई) येथे लालबहादूर शास्त्री महानगरपालिका शाळेजवळ पादचारी भुयारी मार्ग बांधण्याबाबत

**(२०) * ३५६७९ श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुलुंड चेकनाका (मुंबई) येथील मुलुंड बसडेपो ते लालबहादूर शास्त्री महानगरपालिका शाळेजवळ वाहतुकीच्या वर्दळीमुळे रस्ता ओलांडतेवेळी मोठ्या प्रमाणात अपघात होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी अपघात होत असल्याने पादचाऱ्याकरिता भुयारी मार्ग बांधण्याबाबत प्रमुख अभियंता (पुल), मुंबई महानगरपालिका यांस दिनांक ३१ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने भुयारीमार्ग बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) मुलुंड चेकनाका येथील लालबहादूर शास्त्री मार्गावर जानेवारी, २०१६ ते जुलै, २०१७ च्या दरम्यान अपघाताच्या २ घटना घडल्या आहेत ही वस्तुस्थिती आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) प्रस्तावित मेट्रो-४ प्रकल्पामुळे सदर ठिकाण बाधित होत असल्याने, मुलुंड चेकनाका येथे पादचाऱ्यांसाठी भुयारी मार्ग बांधण्याचा सर्वसाधारण आराखडा सादर करण्याबाबत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने बृहन्मुंबई महानगरपालिकेस कळविले आहे. त्यानुषंगाने महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे:-

- विविध उपयोगिता सेवा विभागाचे (Utility Agency) अभिप्राय घेण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे.
- सल्लागाराची नियुक्ती करण्यात आली आहे.
- भुयारी मार्गाच्या शक्याशक्यतेची पडताळणी करुन पुढील कार्यवाही प्राधान्याने करण्यात येत आहे.

-----------------

## राज्यातील चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या मागण्याबाबत

**(२१) * ३५९५६ श्री.प्रकाश गजभिये, श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या मागण्या मान्य करुनही अंमलबजावणी करण्यात आली नसल्याने त्यांनी दिनांक २१ व २२ सप्टेंबर, २०१७ रोजी संप पुकारण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कर्मचाऱ्यांच्या कोणकोणत्या मागण्या आहेत, तसेच सदर मागण्याची अंमलबजावणी करणेबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) कर्मचाऱ्यांच्या खालीलप्रमाणे प्रमुख मागण्या आहेत.

१. सर्व खात्यातील चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांची रिक्त पदे ४ थी ते ९ वी पास मधून तात्काळ भरती करावी.
२. अनुकंपा तत्वावरील सेवाभरती विनाअट करावी.
३. चतुर्थश्रेणी कर्मचारी वर्ग सेवानिवृत्त झाल्यावर त्यांच्या एका पाल्यास शासन सेवेत सामावून घ्यावे.
४. चतुर्थश्रेणी कर्मचारी वर्गातील कर्मचारी जर वैद्यकीय दृष्टया अपात्र झाल्यास त्या कर्मचाऱ्याच्या पाल्यास शासन सेवेत सामावून घेणे.
५. सर्व चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना शासकीय वसाहत गृह खात्याप्रमाणे बांधून मिळावेत.
६. सातवा वेतन आयोग फरकासह तात्काळ मंजूर करावा.
७. वर्ग-४ कर्मचाऱ्यांचे खाजगीकरण करु नये
८. सन २००५ पासून जे चतुर्थश्रेणी कर्मचारी अंशदायी पेन्शन योजना रद्द करुन जुन्या पध्दतीने चालू करावी
९. कृषी विभागामध्ये आकृतीबंध पदे निर्माण करताना १९९८ प्रमाणे वाहन चालक व चतुर्थश्रेणी यांचीपदे निर्माण करावी.

१०. महसूल विभागातील हवालदार, नाईक, दप्तरी पदाचे मूळ वेतन लिपिकाप्रमाणे लागू करण्यात यावे व शैक्षणिक अर्हतेनुसार तलाठी या पदावर पदोन्नती देण्यात यावी.

११. चतुर्थश्रेणीमधून तृतीयश्रेणीमध्ये २५ टक्के ऐवजी ५० टक्के पदोन्नती करताना चतुर्थश्रेणीची पदे निरसित करु नयेत.

१२. शासकीय वसाहतीमध्ये राहणारे सेवानिृत्त कर्मचारी व अनुकंपा तत्वावरील राहणारे कुटुंब यांना तीन महिन्याऐवजी बारा महिने राहण्याचा कालावधी वाढवून देण्यात यावा.

कर्मचाऱ्यांच्या वरील मागण्यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती संबंधित विभागाकडून मागविण्यात आली आहे. तसेच या संदर्भात चर्चा करण्यासाठी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे बैठक आयोजित करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कमाल जमीन धारणा कायद्यांतर्गत ताब्यात घेतलेल्या जमिनीबाबत**

**(२२) * ३५१६२ श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कमाल जमीन धारणा कायदा सन २००७ मध्ये रद्द करण्याच्या आधी सदर कायद्यान्वये शासनाने ज्या जमिनी ताब्यात घेतल्या होत्या त्यांची ताबापत्रे शासनाच्या नावाने जिल्हाधिकारी आणि उपजिल्हाधिकारी यांनी जमीन मालकांना फायदा होण्यासाठी केली नाहीत त्यामुळे फक्त ठाणे जिल्हयात शासनाचे रुपये १० हजार कोटींचे नुकसान झाल्याचे तसेच स्वस्त घर बांधणीसाठी जमीन मिळू शकली नाही असे दिनांक ९ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्‌नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) नागरी जमीन (कमाल धारणा व विनियमन) अधिनियम, १९७६ मधील कलम ८(४) अन्वये अतिरिक्त घोषित करण्यात आलेल्या जमिनींवर अधिनियमाच्या कलम २० (१) अन्वये गृहबांधणी, भुखंडविकास, औद्योगिक व कृषी प्रयोजनार्थ सुट देण्यात आली आहे. अशा जमिनी तसेच कलम १० (३) व १० (५) नुसार शासनाकडे निहित झालेल्या जमिनी नागरी जमीन (कमाल धारण व विनियमन) अधिनियम, १९९९ नुसार संरक्षित आहेत.

सदर निरसन अधिनियमातील तरतूदी आणि मे.व्होल्टास प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार दिनांक २९/११/२००७ पूर्वी ज्या जमिनींचा ताबा घेण्यात आलेला आहे अशा जमिनींना संरक्षण प्राप्त असल्याने, उक्त अधिनियमातील तरतूदीनुसार ताब्यात न आलेल्या जमिनींबाबत शासनाचे नुकसान झाले असे म्हणणे उचित होणार नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## परभणी महानगरपालिकेतील विद्युत देयकामध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२३) * ३५४३३ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी महानगरपालिकेची विद्युत देयके इतर खाजगी व्यक्तींच्या नावे भरून कोटयवधी रूपयांचा आर्थिक गैरप्रकार केल्याची घटना माहे सप्टेंबर-ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गैरप्रकार करणारे महानगरपालिका विद्युत मंडळ मधील कर्मचारी यांचे निलंबन करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महानगरपालिकेतील रकमेचे संनियंत्रण करणारे आयुक्त, उपायुक्त, अकाऊंटंट, लेखापरिक्षक व इतर जबाबदार अधिकारी-कर्मचारी व यंत्रणा यांच्या कारभाराचीही चौकशी करण्यात येणार आहे काय,

(४) नसल्यास, कनिष्ठावर कारवाई व वरिष्ठांना पाठीशी घालण्याची भूमिका शासनस्तरावरून केली जात आहे काय ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) परभणी महानगरपालिका इमारत विद्युत देयकामध्ये रुपये ७९.६४ लक्ष रकमेचा गैरव्यवहार झाल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास आले आहे. ही वस्तुस्थिती आहे.

(२) सदर गैरप्रकारास श्री.अब्दुल जावेद अब्दुल शकुर हे परभणी महानगरपालिकेमधील रोजंदारीवरील कर्मचारी जबाबदार असून, सदर गैरव्यवहाराबाबत त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आलेला असून पोलीसांच्या आर्थिक गुन्हे शाखेमार्फत तपास सुरु आहे.

(३) व (४) प्रस्तुत गैरव्यवहारासंदर्भात रोजंदारी कर्मचाऱ्याच्या सेवा समाप्त कराव्यात व याप्रकरणी सविस्तर चौकशी करून संबंधितांवर शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्याच्या सूचना आयुक्त, परभणी महानगरपालिका यांना देण्यात आलेल्या आहेत.

-----------------

## पालघर जिल्हयात पोलीस संख्याबळ, यंत्रसामुग्री व पोलीस वाहनांमध्ये वाढ करण्याबाबत

**(२४) * ३५३४९ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयाची दिनांक १ ऑगस्ट, २०१४ रोजी निर्मिती होऊनही या जिल्हयात पोलीस संख्याबळ, यंत्रसामुग्री व पोलीस वाहनांमध्ये वाढ करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, तद्नुषंगाने उक्त जिल्हयात पोलीस संख्याबळ, यंत्रसामुग्री व पोलीस वाहनांमध्ये वाढ करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) ठाणे जिल्ह्याचे विभाजन करुन दिनांक १ ऑगस्ट, २०१४ पासून पालघर जिल्हा नव्याने कार्यान्वित करण्यात आला आहे. त्यानुषंगाने नवनिर्मित पालघर जिल्हा पोलीस दलासाठी पोलीस अधिक्षक, ठाणे ग्रामीण यांच्या आस्थापनेवरुन ३०२० पदे वर्ग करण्यात आली आहेत. तसेच विविध शासन निर्णयान्वये २५८ पदे नव्याने निर्माण करण्यात आलेली आहेत. सद्यस्थितीत पालघर जिल्हा पोलीस दलासाठी एकुण ३२७८ पदे मंजूर आहेत.

पालघर जिल्ह्यासाठी पोलीस अधिक्षक, ठाणे ग्रामीण यांच्याकडून १७५ पोलीस मोटार वाहने/बोटी, ३०४ बिनतारी संदेश यंत्रसामुग्री, १०८४ शस्त्रे व १२६६६१ एवढा दारुगोळा वर्ग करण्यात आला आहे. तसेच जिल्हा विभाजनानंतर पालघर जिल्हा पोलीस दलासाठी १०८ पोलीस मोटार वाहने/बोटी, १३९ बिनतारी संदेश यंत्रसामुग्री, ५७४ शस्त्रे व १०४१२४ एवढा दारुगोळा नव्याने मंजूर करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## म्हाडाच्या संक्रमण शिबिरातील घरांची दुरवस्था झाल्याबाबत

**(२५) * ३५८३३ श्री.प्रविण दरेकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक २४७६९ ला दिनांक ७ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दक्षिण मुंबईतील म्हाडाच्या ५० संक्रमण शिबिरातील घरे तुटलेले छत, फुटलेल्या लाद्या, तुटलेले पीलर व बीम, खिडक्या, प्रसाधनगृह व स्नानगृहाचे तुटलेले दरवाजे अशा प्रकारे येथील घरांची अत्यंत दुरवस्था झाली असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याच कारणास्तव संक्रमण शिबिरात जाण्यास धोकादायक इमारतीतील रहिवाशी तयार होत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त संक्रमण शिबिरांच्या दुरुस्तीबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश महेता :** (१) म्हाडाच्या अहवालानुसार मुंबईतील म्हाडाच्या संक्रमण शिबीरामधील काही गाळ्यांच्या बाबत छत, लाद्या, प्रसाधन गृह, स्नानगृह, पिलर तसेच बिमची नादुरुस्ती झाल्याचे दिसून येते.

(२) व (३) दक्षिण मुंबईतील कुलाबा संक्रमण शिबिराची निर्मिती ३५ ते ४० वर्षापुर्वी झालेली आहे. सदर चाळीमध्ये ६७२ निवासी व १३ अनिवासी गाळे वितरित करण्यात आले होते. चाळीची दुरवस्था झाली कारणाने सदर संक्रमण शिबिरांच्या जागेचा पुनर्विकास करण्याकरिता २४ चाळी तोडण्यात आल्या आहेत. सदर पुनर्विकास मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळामार्फत करण्यात येत आहेत व उर्वरित २२ चाळी सध्या अस्तित्वात असून या चाळीत ३२२ रहिवाशी व १३ अनिवासी वास्तव्यात आहेत. तोडण्यात न आलेल्या २२ चाळींच्या दुरुस्तीसाठी कामांचे निविदाप्रक्रिया प्रगतीपथावर आहे.

दक्षिण मुंबईतील सदर संक्रमण शिबीर तसेच मुंबईमध्ये असलेल्या अन्य संक्रमण शिबीरामध्ये सुध्दा आवश्यक ती कामे उदा. इमारतीमधील पाण्याची गळती बंद करणे, तुटलेले दरवाजे बदलणे, गिलावा खराब झाला असल्यास दुरुस्ती करणे, पावसाळ्यात गटारे स्वच्छ करणे, पाण्याच्या टाक्या साफ करणे इत्यादी म्हाडाच्या इमारत व दुरुस्ती मंडळाकडून करण्यात येत असतात. मुंबई शहरामध्ये जुन्या व धोकादायक उपकर प्राप्त इमारतीमधील भाडेकरु यांच्या कौटुंबिक समस्या, शैक्षणिक बाबी इत्यादी कारणामुळे मुंबई उपनगरातील संक्रमण शिबीरा ऐवजी मुंबई शहरातील संक्रमण गाळयांची मागणी करत असतात.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद शहरात नवीन ड्रेनेज व्यवस्था उभारण्याबाबत

**(२६) * ३५३१४ श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरात महानगरपालिकेने २५ ते ३० वर्षापूर्वी शहराची लोकसंख्या विचारात घेवून जुन्या शहरात बांधलेली अंतर्गत ड्रेनेज व्यवस्था कालबाहय झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहराची हद्दवाढ होवून शहरालगतचे काही भाग महापालिकेत समाविष्ट करण्यात आले असल्यामुळे व लोकसंख्या वाढीमुळे येथील ड्रेनेज व्यवस्था कोलमडली असून त्याचा नागरिकांना त्रास होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून येथे नवीन ड्रेनेज व्यवस्था उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.

- औरंगाबाद शहरासाठी युआयडीएसएसएमटी अभियानांतर्गत सन २०१३ मध्ये रुपये ३६५.६९ कोटी किंमतीची मलनि:सारण योजना मंजूर केली आहे.
- या योजनेव्दारे शहरातील विविध भागांमध्ये २६०.०० कि.मी. लांबीच्या मलनि:सारण वाहिन्या टाकण्याचे प्रस्तावित होते. त्यापैकी सद्य:स्थितीमध्ये एकूण १७५.३० कि.मी लांबीच्या मलनि:सारण वाहिन्या टाकण्यात आलेल्या आहेत.
- तर, एकूण २१६ एमएलडी मलप्रक्रिया क्षमता निर्माण करण्याचे प्रस्तावित होते. त्यापैकी २०६ एमएलडी मलप्रक्रिया क्षमतेच्या कामाची भौतिक प्रगती अंदाजे ८४% इतकी झाली असून १० एमएलडी क्षमतेच्या मलप्रक्रिया केंद्रासाठी जागेची समस्या असल्याने सदर काम अद्याप सुरु झालेले नाही.
- सदर प्रकल्पाचे काम माहे डिसेंबर, २०१७ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

(२) व (३) औरंगाबाद महानगरपालिका हद्दीमध्ये नव्याने समावेश करण्यात आलेल्या भागांमध्ये भौतिक सुविधा देण्यात आलेल्या नसल्यामुळे त्या क्षेत्रात मलनि:सारण व्यवस्थेसाठी सविस्तर प्रकल्प अहवाल औरंगाबाद महानगरपालिकेमार्फत तयार करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## लालबाग (मुंबई) येथील उड्डाणपुलाची दुरुस्ती करण्याबाबत

**(२७) * ३४७९४ श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.अनिल भोसले : तारांकित प्रश्न क्रमांक ३००१३ ला दिनांक ५ एप्रिल, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लालबाग (मुंबई) येथील उड्डाणपुलाचे काम पूर्ण झाल्यानंतर पुलाला तडे गेल्याने मा.मुंबई उच्च न्यायालयाने उड्डाणपुलाचे काम माहे फेब्रुवारी, २०१८ पर्यंत पूर्ण करण्याचे आदेश दिल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दुरुस्तीपूर्वी सदर पुलाचे "स्ट्रक्चरल ऑडीट" देखील करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, धोकादायक उड्डाणपुलामुळे जिवित हानी होण्याची शक्यता असल्याने शासनाने पुल दुरुस्तीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) लालबाग येथील उड्डाणपुलाच्या दुरुस्तीचे काम दिनांक २८ फेब्रुवारी, २०१९ पर्यंत पूर्ण करण्याचे आदेश मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिनांक १३ सप्टेंबर, २०१७ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेस दिले आहेत ही वस्तुस्थिती आहे.
(२) सदर उड्डाणपुलाच्या संरचनात्मक परिक्षणासाठी (स्ट्रक्चरल ऑडिट) नियुक्त करण्यात आलेल्या सल्लागाराने संरचनात्मक परिक्षण अहवाल दिनांक ०८ फेब्रुवारी, २०१७ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेस सादर केला आहे.
(३) व (४) सदर उड्डाणपुलाच्या दुरुस्तीबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे:-

- रेट्रोफिटींग स्कीम व अंदाजपत्रक तयार करण्याच्या कामासाठी सल्लागाराची नियुक्ती करण्यात आली आहे.
- रेट्रोफिटींग स्कीम प्राप्त झाल्यानंतर आय.आय.टी. मुंबई यांचेमार्फत त्याची तपासणी करण्यात येऊन निविदा प्रक्रिया सुरु करण्यात येणार आहे.

-----------------

## गोरेगांव (पश्चिम), मुंबई येथे म्हाडाच्या जागेवर घरे बांधण्याच्या घेतलेल्या निर्णयाबाबत

**(२८) * ३५५६७ ॲड.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील गोरेगाव (प.) बांगूर नगर येथील इनऑर्बिट मॉलजवळ म्हाडाच्या १५ एकर जागेवर सुमारे ४ हजार घरे बांधण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भूखंडावर गृहप्रकल्प राबविण्यासाठी म्हाडाच्यावतीने आराखडा तयार करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार हा प्रकल्प किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश महेता :** (१) मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाकडून प्राप्त अहवालानुसार हे अंशत: खरे आहे.

(२) व (३) उपरोक्त भूखंडावर सर्वसामान्यांना परवडणारी योजना राबविण्यासाठी दिनांक २७/११/२०१७ रोजी निविदा मागविण्यात आली आहे. निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यावर नेमणूक केलेल्या ठेकेदारास काम सुरु करण्याचे आदेश दिलेल्या तारखेपासून ३ वर्षांच्या कालावधीत पूर्ण करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे, असे मुख्य अधिकारी, मुंबई मंडळ यांनी त्यांच्या अहवालात नमूद केले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अर्धापूर तालुक्यातील (जि.नांदेड) भोकरफाटा परिसरात सशस्त्र दरोडा टाकल्याच्या घटनेबाबत

**(२९) * ३५५९४ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अर्धापूर तालुक्यातील (जि.नांदेड) भोकरफाटा परिसरातील दाभाड शिवारात असलेल्या सत्यगणपती देवस्थानावर दिनांक १७ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास चोरटयांनी सशस्त्र दरोडा टाकून मोठी लूट केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काही दिवसापूर्वी विष्णूपुरी परिसरातील काळेश्वर महादेव मंदिरातील दानपेट्या फोडून लाखो रुपये चोरटयांनी लुटून नेले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या दोन्ही गुन्हयांचा शोध घेऊन दोषीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) दिनांक १८/०८/२०१७ रोजी दाभाड शिवारातील सत्यगणपती देवस्थान येथे मंडपातील दानपेटी फोडून दरोडा घालण्याचा प्रयत्न केला आहे. तथापि, या घटनेत मालमत्ता चोरीस गेलेली नाही.

(२) होय, हे खरे आहे.

काळेश्वर मंदिरातील दानपेट्या फोडुन चोरट्यांनी अंदाजे दोन ते अडीच लाख रुपये चोरुन नेले आहेत.

(३) सत्यगणपती देवस्थानावरील दरोडा प्रकरणी पोलीस स्टेशन, अर्धापूर येथे गु.र.नं. २२८/२०१७ भा.दं.वि. कलम ३९५, ३९८, २०१ प्रमाणे दिनांक १८/०८/२०१७ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असुन, यात कोणतीही मालमत्ता चोरीस गेलेली नाही.

काळेश्र्वर महादेव मंदिरातील दान पेट्या फोडून केलेल्या चोरीबाबत पोलीस स्टेशन, नांदेड ग्रामीण येथे गु.र.नं. ४९३/२०१७ भा.दं.वि.कलम ३७९ प्रमाणे दिनांक ०४/०९/२०१७ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

उपरोक्त दोन्ही गुन्हे उघडकिस आणण्याचा कसोशीने प्रयत्न करण्यात येत असुन, सदर गुन्हयाचा तपास सूरु आहे.

(४) विलंब झाला नाही.

-----------------

## डोंबिवली-माणकोली (जि.ठाणे) दरम्यानच्या पुलाचे बांधकाम पूर्ण करणेबाबत

**(३०) * ३४८२३ ॲड.निरंजन डावखरे : दिनांक ४ ऑगस्ट, २०१६ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ६ मधील प्रश्न क्रमांक १८२०५ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली शहरामधील वाहतूक कोंडीची समस्या दूर करण्यासाठी शासनाने कल्याण येथील दुर्गाडी समांतर पुल आणि डोंबिवली पश्चिमेतील मोठागाव ते भिवंडीतील माणकोली दरम्यानच्या पुलाचे काम गेल्या दिड वर्षापूर्वी सुरु करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पुलाच्या बांधकामास रुपये ७६ कोटी खर्च अपेक्षित असून डोंबिवलीकडील मोठागाव येथे पुलाच्या एका टोकाकडील काम पूर्ण झाले असून माणकोली या दुसऱ्या टोकाकडील तेथील काही व्यक्तींची भू-मालमत्ता वाचविण्याच्या दृष्टीने सदर काम जाणीवपूर्वक रखडविण्यात आले असल्याचे दिनांक १५ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पुलाचे रखडलेले काम तातडीने पूर्ण करण्यात यावे अशा आशयाचे निवेदन तेथील नागरिकांनी माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान मा.मुख्यमंत्री, मा.पालकमंत्री, ठाणे जिल्हा व अप्पर मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांना सादर केल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर पुलाच्या बांधकामावर आतापर्यंत किती खर्च झाला आहे व उर्वरित काम केव्हापर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे, तसेच या कामाची सद्यःस्थिती काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) नाही.

(३) होय.

(४) व (५) माणकोली मोठागाव या प्रस्तावित रस्त्यावरील सहा पदरी खाडी पुलाच्या कामास रुपये २२३ कोटी व दुर्गाडी किल्ला येथील सहा पदरी खाडी वरील पुलास रुपये ७६.३ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे. सदर कामाची माणकोली टोकाकडील भूसंपादनाची प्रक्रिया जिल्हाधिकारी, ठाणे यांचेमार्फत सुरु आहे.

माणकोली ते मोठागाव या खाडी पुलाच्या बांधकामावर रुपये १५ कोटी आणि दुर्गाडी येथील पुलावर रुपये १२.१५ कोटी इतका खर्च झालेला आहे व उर्वरित कामे जागेच्या उपलब्धते नुसार मे, २०१९ पर्यंत पुर्ण होणे अपेक्षित आहे. सद्य:स्थितीत डोंबिवलीकडील मोठागाव बाजुकडील पुलाचे काम प्रगतीपथावर आहे आणि दुर्गाडी येथे पुलाचे काम सुरु आहे.

-----------------

## स्मार्ट सिटी अमृत अभियान व स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत राज्यातील हागणदारीमुक्त शहरांच्या तपासणीबाबत

**(३१) * ३५७१७ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र नागरी विकास अभियान संचालनालयाच्या स्मार्ट सिटी अमृत अभियान व स्वच्छता महाराष्ट्र अभियानांतर्गत राज्यातील हागणदारीमुक्त होणाऱ्या शहरांची तपासणी करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तपासणीसाठी राज्यस्तरीय समित्या गठित करण्यात आल्या असून सदर समित्या गठित करताना सदस्यांची नावे व पदे वेगवेगळी असल्याचा प्रकार माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार दोषीविरुद्ध कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत शहर हागणदारी मुक्त घोषित करणे व त्याची तपासणी करण्याबाबत दिनांक २९ ऑक्टोबर, २०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये पुढीलप्रमाणे टप्पे निश्चित करण्यात आले आहेत.

- नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने संबंधित शहर हागणदारी मुक्त झाल्याची स्वयंघोषणा करणे.
- जिल्हाधिकाऱ्यांनी नियुक्त केलेल्या समितीमार्फत संबधित शहराची प्राथमिक तपासणी करणे.
- राज्य शासनामार्फत नियुक्त केलेल्या समितीमार्फत तपासणी करणे.
- केंद्र शासनाच्या त्रयस्थ संस्थेमार्फत तपासणी करणे.

(२) हे खरे नाही, दिनांक २९ ऑक्टोबर, २०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार हागणदारी मुक्त शहराची तपासणी करण्यासाठी राज्य शासनामार्फत नियुक्त करण्यात येणाऱ्या समितीमध्ये शासकीय अधिकारी, शासनाने नामनिर्देशित केलेला पत्रकार तसेच स्वयंसेवी संस्थेचा प्रतिनिधी इत्यादीचा समावेश करण्यात येतो. त्यानुसार कार्यवाही करण्यात आली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील महानगरपालिकांमधील विधी अधिकाऱ्यांच्या पदांमध्ये वाढ करणेबाबत

**(३२) * ३५७१० श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या विरोधात दिवाणी न्यायालयापासून सर्वोच्च न्यायालयापर्यंत सद्य:स्थितीला ९० हजाराहुन अधिक प्रकरणे प्रलंबित असून या सगळयांची जबाबदारी अवघ्या ८९ विधी अधिकाऱ्यांवर असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अतिरिक्त कामामुळे या अधिकाऱ्यांकडून न्यायालयांना आवश्यक ते कायदेशीर सहकार्य मिळत नसल्याने विशेषत: मोडकळीस आलेल्या इमारतींच्या प्रकरणांमध्ये निर्णय देणे कठीण होऊन याप्रकरणातील आरोपी सुटण्याची शक्यता निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ही परिस्थिती राज्यातील अनेक महानगरपालिकांची असल्याने त्यांची अनेक प्रकरणे विधी अधिकाऱ्यांच्या कमतरतेमुळे प्रलंबित राहत असल्याने अधिकाऱ्यांच्या पदांमध्ये वाढ करुन महानगरपालिकांनी मा.उच्च न्यायालयातील प्रकरणांसाठी विशेष वकीलांची नियुक्ती करुन कनिष्ठ न्यायालयातील वकिलांची स्वतंत्र फळी उभारण्यासाठी शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) अशा आशयाची बातमी दिनांक ९ सप्टेंबर, २०१७ रोजीच्या दैनिक लोकसत्ता या वृत्तपत्रात प्रसिध्द झाली होती ही वस्तुस्थिती आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) ज्येष्ठ विधिज्ञ व लॉ फर्म यांच्या नामप्रविष्टीका (पॅनल) तयार करण्याची कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

महानगरपालिकेतील प्रलंबित न्यायालयीन प्रकरणांचा आढावा घेऊन अतिरिक्त विधी अधिकाऱ्यांची व विशेष वकीलांची नेमणूक करणे आवश्यक असल्यास, त्याबाबत निर्णय घेण्यास प्रत्येक महानगरपालिका सक्षम आहे.

-----------------

## सिंदी (रेल्वे) नगरपरिषद (जि.वर्धा) येथील सिमेंट रस्त्याच्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(३३) * ३६७८८ श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.आनंदराव पाटील, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंदी (रेल्वे) नगरपरिषद (जि.वर्धा) येथील रेस्ट हाऊस ते रेल्वे स्थानक पर्यंत तयार करण्यात आलेल्या सिमेंट रस्त्याच्या कामात गैरव्यवहार झाल्याने उक्त प्रकरणी लोकप्रतिनिधीनी पोलीस अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर यांच्याकडे तक्रार केल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषीविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) सिंदी (रेल्वे) नगरपरिषद जि.वर्धा येथील रेस्ट हाऊस ते रेल्वे स्थानकापर्यंत तयार करण्यात आलेल्या सिमेंट रस्त्याच्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबतचा तक्रार अर्ज लाचलुचपत प्रतिबंधक विभागास प्राप्त झाला असून सदर अर्जाच्या अनुषंगाने अर्जात नमूद अर्जदार यांच्याशी संपर्क करण्यात आला असता सदरचा तक्रार अर्ज त्यांनी दिलेला नसल्याबाबत अर्जदाराने सांगितले आहे. तथापि, सदर प्रकरणात लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर परिक्षेत्र कार्यालयाकडून पडताळणी करण्यात येत आहे.

-----------------

## न्यू इंग्लिश स्कूल, मंगळवेढा या शाळेच्या शेजारी असलेली गटार बंदिस्त करणेबाबत

**(३४) * ३६९२४ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) न्यू इंग्लिश स्कूल, मंगळवेढा या शाळेच्या शेजारील असलेले गटार बंदिस्त न करता सदर दुर्गंधीयुक्त पाणी दामाजी चौक येथे सोडण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दुर्गंधीयुक्त पाण्यामुळे परिसरात मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरली असून उपरोक्त भागात इयत्ता १ ली ते १२ वी पर्यंतची इंग्लिश स्कूल असल्याने याचा विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत असून उक्त गटार बंदिस्त करणेबाबत स्थानिक नागरिक व शाळा व्यवस्थापन यांच्याकडून मागणी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

मंगळवेढा नगरपरिषद हद्दीतील पेट्रोल पंपापासून न्यू इंग्लिश स्कूल समोरील रस्त्याच्याकडेला नगरपरिषदेने गटारे बांधलेली आहेत. सदरची गटारे बंदीस्त असून गाळ काढण्यासाठी ३० ते ४० फूट अंतरावर चेंबर ठेवलेले आहेत. तसेच दामाजी चौक येथे दुर्गंधी युक्त पाणी सोडण्यात आलेले नाही.

(२) हे खरे नाही.

शाळेतील विद्यार्थ्यांना येण्या-जाण्यासाठी सोईचे व्हावे यासाठी गटारे बंदिस्त करण्यात आलेली आहेत. सदर ठिकाणी दुर्गंधी पसरलेली नाही. गटार बंदिस्त असल्याने स्थानिक नागरिकांनी व शाळा व्यवस्थापनाने गटार बंदिस्त करण्याची मागणी केल्याचे दिसून येत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे मागाठाणे येथील झोपडपट्टी पुनर्वसनाबाबत

**(३५) * ३६९७८ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे मागाठाणे (ता.बोरीवली, मुंबई) येथील न.भू.क्र. २ २१७, २१७/१ ते ५९, २१८, २१८/१ ते ३२ या क्षेत्राचा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणांतर्गत विकास करण्यासाठी सन २००३ मध्ये मंजूर केलेला आराखडा रद्द करुन माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान सुधारित आराखडा मंजूर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुधारित आराखडा मंजूर करण्यापूर्वी इमारत क्र. ७ व इमारत क्र. ८ लगतचा भूखंड मनोरंजन मैदानाकरिता (R.G.Plot) आरक्षित ठेवण्यात आलेला असताना सदरचे आरक्षणात बदल करण्यापूर्वी २/३ खरेदीदारांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक असतांनाही झोपडपट्टी प्राधिकरणाने खरेदीदारांची पूर्व परवानगी न घेता उक्त आरक्षणात बदल केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून २/३ खरेदीदारांची पुर्व परवानगी न घेता भुखंडाच्या आरक्षणात बदल करणाऱ्या अधिकाऱ्यांवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश महेता :** (१) हे खरे नाही. मौजे मागाठाणे (ता.बोरीवली, मुंबई) येथील न.भू.क्र.२ २१७, २१७/१ ते ५९, २१८, २१८/१ ते ३२ या क्षेत्राचा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणांतर्गत विकास करण्यासाठी सन २००३ च्या मंजूर केलेल्या अभिन्यासाच्या आराखडयामध्ये बदल करण्यासाठी माहे जानेवारी, २०१७ मध्ये सुधारित आशयपत्रान्वये झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने मंजूरी दिलेली आहे.

(२) आरक्षणात बदल करण्यासाठी खरेदीदारांची पुर्वपरवानगी घेण्याबाबत विकास नियंत्रण नियमवली १९९१ मध्ये खंड ३३.१० मध्ये नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील विविध शहरे नियमित हवाईसेवेव्दारे जोडण्याबाबत

**(३६) * ३७०६० श्री.आनंदराव पाटील, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, आर्कि.अनंत गाडगीळ, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.हरिसिंग राठोड, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सुभाष झांबड : तारांकित प्रश्न क्रमांक २५५८७ ला दिनांक ७ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विविध शहरे नियमित हवाई सेवेव्दारे जोडण्याबाबत केंद्र शासनाच्या प्रस्तावित धोरणाशी सुसंगत धोरण आखण्याची कार्यवाही शासनाकडून पुर्ण झाली आहे काय,
(२) असल्यास, राज्यात कोणकोणत्या शहरात हवाई सेवा सुरु करण्याचा निर्णय शासनाने घेतला वा घेण्यात येत आहे,
(३) असल्यास, राज्याच्या हवाई वाहतुकीबाबतचे शासनाने धोरण तयार केले आहे काय व त्याचे स्वरुप काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) केंद्र शासनाच्या राष्ट्रीय विमानवाहतूक धोरणांतर्गत राबविण्यात येणाऱ्या Regional Connectivity Scheme (RCS-उडान) या योजनेच्या अंमलबजावणीसाठी दिनांक २३ ऑगस्ट, २०१६ रोजी केंद्र शासन, राज्य शासन व भारतीय विमानपत्तन प्राधिकरण यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्यात आला असून या योजनेंतर्गत महाराष्ट्र राज्यातील अ) अमरावती, ब) गोंदिया, क) नाशिक, ड) जळगाव, इ) नांदेड, फ) सोलापूर, ग) कोल्हापूर, ह) रत्नागिरी, ई) सिंधुदुर्ग ही विमानतळे RCS विमानतळे म्हणून अधिसूचित करण्यात आली आहेत.

(३) राज्याच्या हवाई वाहतुकीबाबतचे धोरण तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई विमानतळानजिकच्या झोपडपट्टीवासियांचे पुनर्वसन करण्याबाबत

**(३७) * ३७२५८ अॅड.अनिल परब : तारांकित प्रश्न क्रमांक २७९२८ ला दिनांक ८ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विमानतळानजिकच्या झोपडयांचे अनेक वर्षांपासून रखडलेल्या पुनर्वसनाबाबत मा.मुख्यमंत्री महोदयांनी माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान आढावा घेऊन सदर झोपडयांच्या १४ वस्त्यांचे प्रामुख्याने पुनर्वसन करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त झोपडयांच्या सर्वेक्षणाचे काम पूर्ण झाले आहे काय, सदर झोपडपट्टीवासियांचे कोणत्या ठिकाणी पुनवर्सन करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, उक्त कामास कैंव्हापर्यंत प्रत्यक्षात सुरुवात होणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) विमानतळ अधिसूचित क्षेत्रामधील अंदाजे ३५ झोपडपट्टयांपैकी सुरक्षिततेच्यादुष्टीने अतिसंवेदनशील असलेल्या १४ झोपडपट्टयांचे (विभाग) सर्वेक्षण प्राथम्याने पूर्ण करण्याचे निर्देश देणेत आलेले होते. तथापि मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ कंपनी मर्यादित (MIAL) यांनी केलेल्या विनंतीवरुन तीन विभाग सदर प्राधान्य सूचीमधून वगळून प्राधान्यसूची व्यतिरिक्त ६ विभागांमध्ये मिळून एकंदर १७ विभागांमध्ये सर्वेक्षणाचे काम हाती घेणेत आलेले आहे.

(२) वरील १७ विभागांपैकी १० विभागांमध्ये प्रारुप परिशिष्ट-२ प्रसिध्द करणेत आलेले असून यापैकी ७ विभागांमध्ये अंतिम परिशिष्ट-२ प्रसिध्द करणेत आलेले आहे. सर्वेक्षणाचे काम प्रगतीपथावर आहे.

(३) व (४) स्थानिक झोपडपट्टीधारक हे रहात्या ठिकाणी पुनर्वसन, MUTP च्या धोरणानुसार घरास घर, पुनर्वसनाची जागा स्पष्ट करणेची मागणी करुन सर्वेक्षणास विरोध करुन असहकार्य करीत असल्यामुळे सर्वेक्षणास विलंब होत आहे.

विमानतळ परिसरातील इमारतींच्या उंचीवरील निर्बंध, जागेच्या उपलब्धतेवरील मर्यादा याचा विचार करता शक्य तेथवर अधिकाधिक झोपडीधारकांचे अधिसूचित क्षेत्रामध्ये पुनर्वसन करण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे.

-----------------

## कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचा दिव्यांग विकास निधी व्यपगत झाल्याबाबत

**(३८) * ३४८१९ श्री.जगन्नाथ शिंदे, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या धोरणानुसार कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेकडून वार्षिक अंदाजपत्रकात ३ टक्के प्रमाणे मागील सात वर्षात सुमारे रुपये १२ कोटी ७५ लाख इतक्या निधीची दिव्यांग कल्याण विकास कार्यक्रमासाठी तरतूद केलेला असताना केवळ रुपये ६२ लाख ३४ हजार इतकाच निधी खर्च झाल्याने उर्वरित दिव्यांग विकास निधी व्यपगत झाल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त महानगरपालिका क्षेत्रातील दिव्यांगाना आपल्या मागण्यांसाठी आंदोलन करावे लागत असून त्यांच्या मागण्यांकडे महानगरपालिका प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महानगरपालिकेने खर्च केलेला रुपये ६२ लाख ३४ हजाराचा दिव्यांग विकास कार्यक्रमाचा निधी कोणकोणत्या कामांसाठी व कोणत्या निकष आणि नियमांव्दारे खर्च करण्यात आला आहे,

(४) असल्यास, उर्वरित निधी खर्च न होण्याची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) दिव्यांग कल्याण विकास कार्यक्रमासाठी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या वार्षिक अंदाजपत्रकात मागील सात वर्षात सुमारे रुपये १२ कोटी ७५ लाख इतक्या निधीची तरतूद केली होती. सदर तरतूदीपैकी ६२ लाख ३४ हजार रुपयांचा निधी खर्च करण्यात आला आहे. उर्वरित अखर्चित निधी व्यपगत झाला आहे, ही वस्तुस्थिती आहे. तथापि सन २०१७-१८ या आर्थिक वर्षापासून दिव्यांगांसाठी राखीव निधी व्यपगत करता येणार नसल्याबाबत दिनांक १४/११/२०१७ च्या परिपत्रकान्वये सर्व संबंधितांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(२) महानगरपालिका क्षेत्रातील दिव्यांगांच्या मागण्यांसाठी राष्ट्रीय अपंग विकास महासंघ (महाराष्ट्र राज्य) या संघटनेने आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांना दिनांक २३/०६/२०१७ रोजी दिलेल्या निवेदनातील विविध मागण्यांच्या अनुषंगाने आयुक्त यांच्या स्तरावर कार्यवाही सुरु असून तसे अध्यक्ष, राष्ट्रीय अपंग विकास महासंघ यांना दिनांक ०४/०७/२०१७ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(३) व (४) शासन निर्णय दिनांक २८/१०/२०१५ अन्वये दिव्यांगांसाठी राखीव निधी,

१) स्टॉल उभारण्याकरीता अर्थसहाय्य करणे,
२) ऑडीओ लायब्ररी निर्माण करणे,
३) वैद्यकीय खर्चासाठी सहाय्य करणे, अशाप्रकारच्या एकूण १८ प्रयोजनार्थ खर्च करण्याबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत.

- कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने दिव्यांगांसाठीचा राखीव निधी,
  - दिव्यांगांना कानाचे मशिन बसविणे.
  - दिव्यांगांसाठी विविध साहित्य पुरवठा करणे.
  - दिव्यांगांची नाव नोंदणी करणे, दिव्यांगांचे साहित्य संमेलन आयोजित करणे, अशा विविध बाबींवर खर्च केलेला आहे.
- दिनांक १४/११/२०१७ च्या शासन परिपत्रकान्वये दिव्यांगांसाठी राखीव निधी व्यपगत करता येणार नसल्याचे, तसेच सदर निधीचे पुनर्विनियोजनही करता येणार नसल्याचे सर्व महानगरपालिका व नगरपरिषदांना कळविले आहे.

-----------------

## मुंबईतील भूखंडांचा पुनर्विकास केलेल्या विकासकांनी महानगरपालिकेचा प्रिमियम थकविल्याबाबत

**(३९) * ३५७७१ श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर व उपनगरातील महानगरपालिकेच्या भूखंडावर पुनर्विकास पूर्ण करणाऱ्या विकासकांनी महानगरपालिकेला प्रिमियम पोटी देण्यात येणारी सुमारे ४०० कोटी इतकी रक्कम थकवली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेल्या नऊ वर्षात महानगरपालिकेच्या भूखंडावरील विविध भागातील १२३ एस.आर.ए व अन्य प्रकल्प विकासकांनी पूर्ण केलेले असून या प्रकल्पांमधून प्रिमियम पोटी १२२६ कोटी रुपये येणे अपेक्षित असताना त्यापैकी केवळ ८४२ कोटी रुपये महानगरपालिकेच्या तिजोरीत जमा झाले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार सदर थकीत प्रिमियमची रक्कम वसूल करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) सदर बाब बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या भू-भागावरील संपादित/भाडेकरु मालमत्तांच्या पुनर्विकासाशी निगडीत असून, सदर मालमत्तांच्या एकूण १२३ पुनर्विकास प्रकल्पांना विकास नियंत्रण नियमावली ३३(७) अंतर्गत बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत मंजुरी देण्यात आली आहे.

त्यापैकी ४१ पुनर्विकास प्रकल्प पूर्ण झाले असून, तेथील भाडेकरुंचे कायमस्वरुपी पुनर्वसन करण्यात आले आहे.

उर्वरित ८२ प्रकल्पांतील पुनर्वसन इमारतींचे बांधकाम तसेच विकासकाच्या विक्रीयोग्य इमारतींचे बांधकाम सुरु आहे.

सदर १२३ पुनर्विकास प्रकल्पांमधून बृहन्मुंबई महानगरपालिकेस रुपये १२४०.१३ कोटी प्राप्त होणे अभिप्रेत असून, ३४ प्रकल्पांमध्ये भांडवली मुल्य निरंक आहे.

उर्वरित ८९ प्रकल्पांमधून महानगरपालिकेस रुपये ८४६.९९ कोटी इतकी रक्कम प्राप्त झाली असून, रुपये ३९३.२३ कोटी इतक्या रकमेची वसुली करण्याबाबतची कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

(३) व (४) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत प्रिमियमपोटी शिल्लक असलेली रुपये ३९३.२३ कोटी रक्कम वसुल करण्याकरिता खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत/आली आहे:-

- पुनर्विकास प्रकल्पांचा प्रकल्प कालावधी संपुष्टात आलेल्या प्रकल्पांमधील विकासकांवर कारणे दाखवा नोटीसा बजावण्यात आल्या असून, कार्यकारी अभियंता (इमारत प्रस्ताव) शहर यांना बांधकाम स्थगित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.
- भोईवाडा गांव, परेल, मुंबई येथील नागरी नुतनीकरण योजनेंतर्गत मे.विघ्नहर्ता बिल्डर्स यांनी पुनर्विकासास केलेल्या विलंबाबाबत तसेच महापालिकेचा देय असलेला महसुल न दिल्यामुळे, सदर कंत्राटदाराची नियुक्ती रद्द करण्यात आली आहे.

मा.उच्च न्यायालयाने सदर प्रकल्पाकरिता पुनर्निविदेची प्रक्रिया करण्यास परवानगी दिली आहे. तथापि निविदा अंतिम करण्यास मनाई केली आहे.

-----------------

## पुणे शहरातील शहरातील “हाय कॅपेसिटी मास ट्रान्झिट रुट” प्रकल्पाबाबत

**(४०) * ३५२८३ श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील वाहतुक सुरळीत व्हावी यासाठी शहरातील “हाय कॅपेसिटी मास ट्रान्झिट रुट” (एचसीएमटी) या गत ३० वर्षापासून प्रलंबित असलेल्या वर्तुळाकार रस्त्याच्या प्रकल्पास महानगरपालिकेने माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पाचे कामासाठी किती खर्च येणार आहे तसेच सदर मार्ग पुणे शहरातील कोणकोणत्या भागातून जाणार आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकल्प किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) सदर प्रकल्पासाठी तांत्रीक व आर्थिक सल्लागार नेमणे, आर्थिक तरतूद उपलब्ध करणे यासाठी प्रस्ताव सादर करण्यास व आवश्यक प्रशासकीय पूर्तता करण्याचे अधिकार आयुक्तांना प्रदान करण्यासाठी पुणे महानगरपालिकेच्या मुख्यसभेने दिनांक २५/९/२०१७ रोजी मान्यता दिलेली आहे.
(२) व (३) या प्रकल्पासाठी अंदाजे खर्च रुपये ६,६४६ कोटी एवढा अपेक्षित आहे.

"हाय कॅपेसिटी मास ट्रान्झिट रूट" या मार्गाची आखणी बापोडी, पुणे विद्यापीठ चौक, सेनापती बापट रस्ता, पौड फाटा, कर्वे रोड, दत्तवाडी, सारसबाग, स्वारगेट, नेहरुरस्ता, लुल्लानगर, वानवडी, रामवाडी, मुंढवा, वडगावशेरी, विमाननगर चौक व विश्रांतवाडी या प्रमाणे आहे.
सदर प्रकल्पास सुमारे ३ वर्षे इतका कालावधी लागणार आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील पोलीस दलाच्या आधुनिकीकरणासाठी केंद्र शासनाकडून देण्यात आलेला निधी परत गेल्याबाबत

**(४१) * ३४८६३ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.सुनिल तटकरे, श्री.प्रकाश गजभिये, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.हरिसिंग राठोड, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईवरील दहशतवादी हल्ल्यानंतर राज्यातील पोलीस दलाच्या आधुनिकीकरणासाठी केंद्र शासनाकडून देण्यात आलेला निधी पोलीस दलाच्या विकास योजनेचे आराखडे विहित वेळेत तयार न केल्याने परत गेला अशी माहिती कॅगच्या अहवालातून माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डिजिटल इंडिया, पोलीस दलाचे आधुनिकीकरण, पोलिसांच्या घरांचे बांधकाम, वाहने, शस्त्र पुरवठा यासाठी हा निधी खर्च करता आला असता असे निरीक्षण कॅगने नोंदविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हा निधी खर्च करण्यासाठी विकास कामांचे आराखडे निर्धारित वेळेत पूर्ण न करणाऱ्या पोलीस दलातील संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, भविष्यात पोलीस दलाच्या विकास योजनेचे आराखडे विहित वेळेत तयार करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

मुंबई वरील दहशतवादी हल्ल्यानंतर सन २००९-१० ते सन २०१६-१७ या वित्तीय वर्षात केंद्र शासनाकडून पोलीस दल आधुनिकीकरणाकरीता एकूण रुपये ४००.२३ कोटी इतका निधी प्राप्त झाला आहे. त्यापैकी, रुपये ३५७.५७ कोटी रक्कम शस्त्र व दारुगोळा, यंत्रसामुग्री व साधनसामुग्री, वाहने व इमारती इ.साठी खर्च करण्यात आली आहे. उर्वरित रकमेपैकी सद्यस्थितीमध्ये रुपये ३८.४० कोटी निधी पुनर्जिवित करून तो सन २०१७-१८ मध्ये खर्च करण्याकरिता प्रशासकीय मान्यताही देण्यात आलेली असून त्यानुसार कार्यवाही चालू आहे. त्यामुळे केंद्र शासनाकडून आलेला निधी केंद्र शासनाकडे परत गेलेला नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) पोलीस दलाचे विकास आराखडे विहित वेळेत सादर केले जातात. तसेच, भविष्यात विहित वेळेत सादर करण्याची दक्षता घेतली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक सार्वजनिक बांधकाम विभागातील अधिकाऱ्यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पकडल्याबाबत

**(४२) * ३५४८४ श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दक्षिण विभागातील तीन अधिकाऱ्यांना लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान रंगेहात पकडले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रस्ता दुरूस्तीचे काम पुर्ण केलेल्या ठेकेदाराच्या कामाचे अंतिम देयक मंजूर करण्यासाठी ही लाच स्वीकारली जात होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नाशिक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दक्षिण विभागात यापुर्वी ही बोगस काम करून मोठ्या प्रमाणात लाचखोरी होत असल्याच्या तक्रारी प्राप्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून अधिकाऱ्यांविरूध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय, आरोपी लोकसेवक अजय देशपांडे, शाखा अभियंता, सचिन पाटील, उपअभियंता व देवेंद्र पवार, कार्यकारी अभियंता यांना रुपये ३० हजाराची लाच स्विकारली असल्याने लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम, १९८८ चे कलम ७, १२, १३ (१)(ड) सह १३ (२) प्रमाणे गुन्हा दाखल करुन अटक करण्यात आली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने तिनही आरोपी लोकसेवकांना दिनांक १७/१०/२०१७ च्या आदेशान्वये निलंबित केले आहे.

(३), (४) व (५) हे खरे नाही. परंतु, सन २०१३ मध्ये आरोपी लोकसेवक (१) सतिश मधुकर चिखलीकर, कार्यकारी अभियंता, उत्तर विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक व (२) जगदिश मगन वाघ, शाखा अभियंता, त्र्यंबकेश्वर उपविभाग यांच्याविरुध्द दिनांक ३०/०४/२०१३ रोजी लाचलुचपत

प्रतिबंधक अधिनियम, १९८८ चे कलम ७, १२, १३ (१)(ड) सह १३ (२) प्रमाणे गुन्हा दाखल असुन सदर गुन्हयात मा.विशेष न्यायालय, नाशिक येथे स्पेशल केस नं. ११/२०१४, दिनांक ०३/०६/२०१७ अन्वये दोषारोपपत्र सादर करण्यात आलेले आहे.

-----------------

## रत्नागिरी जिल्हयातील विजयदुर्ग खाडीपट्ट्यातील बंदरातील गाळ उपसा करण्याबाबत

**(४३) * ३५८७९ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयातील विजयदुर्ग खाडीपट्ट्यामध्ये येणाऱ्या जैतापूरचा भाग, साखरीनाटे बंदर येथे कित्येक वर्षापासून गाळ न काढल्याने येथील मच्छिमारांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गाळ उपसा न झाल्यामुळे इतिहास कालीन जैतापूरची खाडी नामशेष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने निर्णय घेवून सदर ठिकाणातील गाळ उपसा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) जैतापूर खाडीतील नौकानयन मार्गामध्ये गाळ साचल्यामुळे त्या ठिकाणी मच्छिमारी नौकांना बंदरात ये-जा करताना अडचणी निर्माण होत आहेत.

(३) जैतापूर साखरीनाटे या बंदरामध्ये ९३००० घनमीटर एवढा गाळ उपसणी करणे आवश्यक आहे. जैतापूर साखरीनाटे ही मत्स्यबंदर असल्यामुळे त्या ठिकाणी गाळ काढण्याकरीता होणारा खर्च मत्स्य विभागाकडून प्राप्त झाल्यानंतर निधीच्या उपलब्धतेनुसार गाळ काढण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई शहर व उपनगरात झालेल्या अतिवृष्टीबाबत

**(४४) * ३४९१२ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.हरिसिंग राठोड, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.कपिल पाटील, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर व उपनगरात तसेच ठाणे, कळवा, मुंब्रा, नालासोपारा, विरार इत्यादी ठिकाणी दिनांक २९ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास झालेल्या अतिवृष्टीमुळे सर्वच भाग जलमय होऊन जनजीवन ठप्प झाले, मुंबईतील मल:निस्सारण, पर्जन्यजल निचरा यंत्रणा व अन्य आपत्ती व्यवस्थापन कोलमडल्यामुळे सुमारे २४ नागरिकांचा मृत्यू झाला व अनेकजण बेपत्ता झाले तर बॉम्बे हॉस्पिटलचे डॉ. दीपक अमरापूरकर यांचा मॅनहोलमध्ये पडून वाहून गेल्यामुळे मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईत नालेसफाई न झाल्यामुळे पाण्याचा निचरा होवू शकला नसल्यामुळे रेल्वे वाहतुक, बस वाहतुक व इतर दळणवळणाची साधने ठप्प झाल्याने नागरिकांना त्रास झाला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई व उपनगरातील अनेक भागात रस्त्याखालील जलवाहिन्यांचे चेंबर्स व मॅनहोल्स नादुरुस्त झाले असून महानगरपालिका जल विभागाचे अभियंता/अधिकारी ते दुरुस्त करत नसल्यामुळे याठिकाणी पडून लोक जखमी होत असून त्यामुळे नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून मृत्यू पावलेल्या व्यक्तींच्या कुटुंबियांना व आपादग्रस्तांना कोणती आर्थिक मदत देण्यात आली तसेच मॅनहोलवर झाकणे बसविण्याबाबत व अशा प्रकारच्या घटना भविष्यात घडू नयेत याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) मुंबई शहर व उपनगरात तसेच ठाणे, कळवा, मुंब्रा, नालासोपारा, विरार या ठिकाणी दिनांक २९/०८/२०१७ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे काही परिसर जलमय होऊन जनजीवन काही प्रमाणात विस्कळीत झाले होते ही वस्तुस्थिती आहे.

अतिवृष्टीमुळे घडलेल्या विविध घटनांमध्ये १८ व्यक्ती मृत, १६ व्यक्ती जखमी आणि १ व्यक्ती बेपत्ता झाली आहे.

मृत व्यक्तींपैकी बॉम्बे हॉस्पिटलचे डॉ. दिपक अमरापूरकर यांचा मृत्यू मॅनहोलमध्ये पडून झाला ही वस्तुस्थिती आहे.

(२) मुंबईत पावसाळयात व पावसाळयापूर्वी पूर्णपणे नालेसफाई करण्यात आली होती.

तथापि, दिनांक २९/०८/२०१७ रोजी मुंबई शहर व उपनगरात सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडला होता. तसेच, यादिवशी समुद्राच्या पाण्याची पातळी नाल्याच्या पाण्याच्या पातळीपेक्षा उंच असल्यामुळे उदंचन केंद्रामार्फत निचरा होण्याकरिता पूर प्रवेशद्वार (फ्लड गेट्स) उघडण्यात आले नाहीत. त्यामुळे मुसळधार पर्जन्यवृष्टीमुळे साचलेल्या पाण्याचा निचरा जलदगतीने होऊ शकला नाही.

या कालावधीत आपत्कालीन व्यवस्थापन विभागामार्फत सर्व आवश्यक त्या यंत्रणांशी समन्वय साधणे, नागरिकांचे आवश्यक त्या ठिकाणी सुरक्षित विमोचन करणे, विविध ठिकाणी अडकलेल्या नागरिकांच्या निवासस्थानाची व खाण्यापिण्याची व्यवस्था करण्यात आली होती.

(३), (४) व (५) अशा प्रकारच्या घटना भविष्यात घडू नयेत याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहेत:-

- भूमिगत मल:निसारण वाहिन्यांवरील मॅनहोलवर झाकणे बसविण्यात आलेली आहेत.
- तथापि, महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त इतरांकडून हेतुपरस्सर उघडण्यात येणाऱ्या मॅनहोल झाकणामुळे काही अपघात होऊ नये यासाठी मॅनहोलच्या झाकणाखाली ५ ते ६ इंच अंतरावर जाळी बसविण्याची कार्यवाही सुरु आहे.
- भूमिगत जलवाहिन्यांवरील चेंबर्सची व झाकणांची नियमित पाहणी करुन आवश्यक दुरुस्ती करण्यात येत आहे.

- अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या नुकसानग्रस्तांना खालीलप्रकारे मदत देण्यात आली आहे:-
- मुंबई उपनगरातील ४ मृत व्यक्तींच्या वारसास प्रत्येकी रुपये ४ लाख इतके आर्थिक सहाय्य देण्यात आले आहे.
- इतर २ मृत व्यक्तींच्या वारसांना, वारस तपासणीनंतर प्रत्येकी रुपये ४ लाख इतके आर्थिक सहाय्य देण्यात येणार आहे.
- उर्वरित ३ मृत व्यक्तींच्या प्रकरणी चौकशी करुन पुढील कार्यवाही जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचेमार्फत करण्यात येत आहे.
- मुंबई शहरातील श्री.शमशम खान यांच्या वारसांना रुपये ४ लाख इतके आर्थिक सहाय्य देण्यात आले आहे.
- डॉ. दिपक अमरापूरकर यांच्या वारसांनी कागदपत्रांची पूर्तता न केल्याने रुपये ४ लाख इतके आर्थिक सहाय्य देता आले नाही.
- घरांची पडझड झालेल्या एकूण ४६ पात्र कुटुंबांना प्रत्येकी रुपये ३८००/- इतके सानुग्रह अनुदान वाटप करण्यात आले आहे.
- ठाणे येथे मृत पावलेल्या ५ व्यक्तींच्या वारसांना प्रत्येकी रुपये ४ लाख इतकी आर्थिक मदत देण्यात आली आहे.
- उर्वरित एका व्यक्तीच्या वारसाला आर्थिक मदत देण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## मुंबईतील सागरी हद्दीतील झोपडयांचे पुनर्वसन करण्याच्या प्रस्तावाबाबत

**(४५) * ३४६७६ श्री.हेमंत टकले, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.प्रकाश गजभिये, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०२२ पर्यंत मुंबई झोपडपट्टीमुक्त करण्याचे दृष्टीने कफ परेड ते दहिसर या सागरी हद्दीत येणाऱ्या झोपडयांचे पुनर्वसन करण्यासाठी प्रामुख्याने सागरी नियमन कायदयातील (सीआरझेड) येणाऱ्या अडचणीतून सुट मिळण्याबाबतचा प्रस्ताव राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावास केंद्र शासनाने मान्यता दिली आहे काय व केंव्हा,
(३) नसल्यास, सदर प्रस्तावास मान्यता मिळण्याचेदृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश महेता :** (१) हे खरे आहे.
(२) प्रस्तावानुसार केंद्र शासनाकडून सुधारित अधिसूचना निर्गमित झालेली नाही.
(३) केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन मंत्रालयाच्या दिनांक ६/१/२०११ च्या अधिसूचनेच्या अनुषंगाने सुधारणेसंदर्भात प्रस्ताव झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने दिनांक २४/१/२०१४ च्या पत्रान्वये केंद्र शासनाचे सचिव, पर्यावरण व वने यांना प्रस्ताव पाठविला होता. या प्रस्तावानुसार मा.मुख्य सचिव यांचेकडे केंद्रीय पर्यावरण सचिव यांच्यासोबत पर्यावरण विषयक झालेल्या विविध विषयांच्या बैठकीत प्रश्नांकित विषयाचा समावेश होता. बैठकीतील चर्चेनुसार पर्यावरण मंत्रालय, केंद्र शासन यांना अभिप्रेत असणारी माहिती दिनांक ९ ऑगस्ट, २०१७ रोजी सचिव, पर्यावरण व वन मंत्रालय केंद्र शासन यांना गृहनिर्माण विभागाने पाठविली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मोहोपाडा पाताळगंगा (ता.पनवेल, जि.रायगड) येथील कंपनीतील कामगारांना कमी केल्याबाबत

**(४६) * ३५६८४ श्री.जयंत पाटील, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील मोहोपाडा पाताळगंगा अतिरिक्त एमआयडीसीत कासप गावाजवळील मे.इंद्रायणी सेल्स प्रा.लि. आणि मे. प्रिंट इट इंडिया प्रा.लि. या नावाच्या कंपनी एकाच ठिकाणी एकाच पत्त्यावर आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंपनीतील महिला कामगारांसह १३ कामगारांना कोणतीही पूर्व सूचना न देता माहे ऑगस्ट, २०१७ पासून कामावरून कमी करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कामावरून कमी केलेल्या कामगारांसह इतर कामगारांनी कंपनीच्या गेट बाहेर दिनांक १९ ऑगस्ट, २०१७ पासून निषेध व बेमुदत धरणे आंदोलन सुरू केले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर कंपनीतून कमी करण्यात आलेल्या सर्व कामगारांना कंपनीत पूर्ववत कामावर घेण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे आहेत ?

**श्री.संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) हे खरे आहे.

(२) मे. इंद्रायणी सेल्स प्रा.लि. मधील ७ व मे. प्रिंट इट इंडिया प्रा.लि. मधील ६ अशा एकुण १३ कामगारांना दिनांक १७/०८/२०१७ रोजीच्या कामगार कपात सूचनेनुसार व्यवस्थापनाने कामावरून कमी केले होते.

(३) कामावरून कमी केलेल्या व कंपनीतील इतर कामगारांनी दिनांक १८/०८/२०१७ ते दिनांक २१/०८/२०१७ या कालावधीत आस्थापनेच्या गेटसमोर निषेध व धरणे आंदोलन केले होते.

(४) यासंदर्भात तोडगा काढण्यासाठी कामगार उप आयुक्त यांच्या कार्यालयात दिनांक ०८/०८/२०१७, दिनांक २१/०८/२०१७, दिनांक ११/०९/२०१७ व दिनांक २६/०९/२०१७ रोजी बैठका आयोजित करण्यात आल्या होत्या. व्यवस्थापनाने कामावरून कमी केलेल्या सर्व १३ कामगारांना दिनांक २२/०८/२०१७ पासून पुन्हा कामावर घेतले आहे. दिनांक २२/०८/२०१७ पासून कामगारांनी संप व धरणे आंदोलने मागे घेऊन काम सुरु केले.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परिक्षांसाठी तामिळनाडू पॅटर्न लागू करण्याबाबत

**(४७) * ३५२३८ श्री.कपिल पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ३२६७० ला दिनांक २६ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परीक्षांमध्ये डमी उमेदवार बसवल्याचे रॅकेट नांदेड येथे निदर्शनास आले असून खोटया क्रीडा प्रमाणपत्रावर राज्यसेवेत अनेकांनी अधिकारी पदावर वर्णी लावून घेतली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बोगस प्रकार रोखण्यासाठी बायोमॅट्रीक हजेरी पध्दत सुरु करणे आणि अन्य मागण्यांसाठी या विद्यार्थ्यांनी सातत्याने केलेल्या आंदोलनाची दखल शासनाने घेतली आहे काय,

(३) असल्यास, राज्यात तामिळनाडू पॅटर्न सुरू करण्याच्या मागणीवर शासनाची भूमिका काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित लिपिक-टंकलेखक (मराठी व इंग्रजी) गट-क परीक्षा २०१४ मध्ये डमी उमेदवार बसवून शासकीय सेवेत गैरमार्गाने नोकरीस लावून देण्या प्रकरणी मांडवी, पोलीस स्टेशन, ता.किनवट, जि.नांदेड येथे गुन्हे अन्वेषण विभागाने गु.र.नं. २७/२०१६, भा.दं.वि. कलम १६७, १७१, १९३, १९७, १९८, २०१, २०३, २१३, २१४, २१८, ४२०, ४१९, ४६७, ४६८, ४७१, १२०(ब), ३४ अन्वये ६ आरोपितांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून मा.न्यायालयात दोषारोप क्र. १७/२०१७ (दिनांक १८/८/२०१७) व क्र. १७ (A)/२०१७ (दिनांक ६/११/२०१७) दाखल करण्यात आले असून सीआरपीसी क्र. १७३ (८) प्रमाणे अधिक तपास करण्यात येत आहे.

शिफारसपात्र उमेदवारांना नियुक्ती देण्यापूर्वी क्रीडा प्रमाणपत्रे तसेच शैक्षणिक अर्हता, वय, आरक्षित प्रवर्ग, इत्यादी दाव्याबाबतची प्रमाणपत्रे पडताळणी करुनच नेमणूका द्याव्यात अशा सूचना आयोगाकडून संबंधित विभागांना देण्यात येतात.

(२) आयोगाच्या स्पर्धा परीक्षांसाठी बायोमॅट्रीक पध्दत वापरणे, प्रतिक्षा यादी, तामिळनाडू पॅटर्न इ. अन्य मागण्यांसाठी निवेदने प्राप्त झालेली आहेत
संभाव्य गैरप्रकार रोखण्यासाठी आयोगाच्या परीक्षेस अर्ज करताना उमेदवाराच्या आधार क्रमांकाचा समावेश अर्जामध्ये करण्याची पध्दत मार्च, २०१७ पासून सुरु करण्यात आली आहे.
(३) व (४) तामिळनाडू पॅटर्नच्या संबंधात उमेदवारांकडून प्राप्त झालेल्या निवेदनाच्या अनुषंगाने आयोगाच्या कार्यालयाच्या स्तरावर तपासणी करण्यात येत असून याबाबत तामिळनाडू लोकसेवा आयोगाकडून तामिळनाडू पॅटर्नच्या वेळापत्रकाच्या अंमलबजावणी व फलनिष्पत्तीबाबत माहिती मागविण्यात आली आहे.

तामिळनाडू पॅटर्न प्रमाणेच आयोगामार्फत पुढील वर्षभरात आयोजित केल्या जाणाऱ्या स्पर्धा परीक्षांचे वेळापत्रक साधारण नोव्हेंबर महिन्यातच उमेदवारांच्या माहितीसाठी आयोगाच्या संकेतस्थळावर आगाऊ प्रसिध्द केले जाते व त्यानुसार परीक्षा घेतल्या जातात.

-----------------

## नाशिक येथील तिबेटीयन मार्केटमधील व्यावसायिक गाळ्यामध्ये झालेल्या स्फोटाबाबत

**(४८) * ३५१७३ डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक येथील तिबेटीयन मार्केटमधील व्यावसायिक गाळ्यात दिनांक ७ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास पहाटे मोठा स्फोट होवून अनेक दुकानांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले असून तीन कामगार जखमी झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, स्फोटाची तीव्रता भीषण असल्याने आसपासच्या दुकानांच्या भिंतीना भगदाड पडणे, दुकानांवरील पत्रे उडणे, लोखंडी शटर तुटणे अशा स्वरुपाचे नुकसान झालेले असून पोलिसांना या स्फोटाची माहिती सुमारे एक तास विलंबाने देण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, खून, हाणामाऱ्या आणि तत्सम गुन्हेगारी कारणांनी नेहमी चर्चेत असणाऱ्या तिबेटीयन बाजारातील स्फोटाबाबत गुढ निर्माण झाल्याच्या पार्श्वभुमीवर पोलिसांनी याप्रकरणी तपास केला आहे काय,

(४) असल्यास, उक्त तपासात काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच स्फोटाचे नेमके कारण काय आहे व भविष्यात अशा घटना घडू नये म्हणून कोणती खबरदारीची उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) या प्रकरणातील आरोपीने नाशिक येथील स्वत:च्या मालकीच्या तिबेटीयन मार्केट लाईन नं. १ येथील गाळा नं. ३ येथे लिकेज असलेला गॅस पाईप, गॅस सिलेंडरला लावल्याने गॅस गळती होवून स्फोट झाल्याचे निदर्शनास आले आहे. यावेळी आरोपीने सुरक्षिततेच्यादृष्टीने कोणतीही व्यवस्था केलेली नव्हती. तसेच सदर दुर्घटनेची माहिती आरोपीने पोलिसांना विलंबाने दिली. या प्रकरणी आरोपीविरुध्द गु.र.क्र.३४९/१७, भा.दं.वि.कलम २८६ अन्वये दिनांक ७/१०/२०१७ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीस दिनांक ०८/१०/२०१७ रोजी अटक करण्यात आली असून आरोपी जामिनावर मुक्त आहे.

सदर गुन्हयांचा तपास सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे विभागातील निष्क्रिय संस्थांची नोंदणी रद्द करण्याबाबत

**(४९) * ३५८९७ आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे विभागातील हिशोब पत्रके व बदल अर्ज सादर न करणाऱ्या निष्क्रीय संस्थांची नोंदणी रद्द करण्याची मोहिम धर्मादाय आयुक्त कार्यालयाने सुरु केली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ज्या संस्था कार्यक्षम आहेत पण त्यांनी हिशोब पत्रके व बदल अर्ज सादर केलेले नाहीत त्यांना त्यांची कागदपत्रे सादर करण्यास संधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई या कार्यालयाचे परिपत्रक क्र. ५१३ दिनांक १३/०९/२०१७ अन्वये हिशोबपत्रके व बदल अर्ज सादर न करणाऱ्या निष्क्रीय संस्थांची नोंदणी रद्द करण्याची मोहिम धर्मादाय आयुक्त कार्यालयाने दिनांक ०१/१०/२०१७ ते ३१/१२/२०१७ या कालावधी करीता सुरु केली आहे.

(२) ज्या संस्था कार्यक्षम आहेत त्यांना हिशोबपत्रके व बदल अर्ज सादर करण्यासाठी विलंब माफीचा अर्ज घेऊन दाखल करण्याकरिता संधी दिली जाते. हिशोबपत्रके व बदल अर्ज सादर न करणाऱ्या निष्क्रीय संस्थांची नोंदणी रद्द करण्याबाबतची प्राथमिक न्यासांची यादी धर्मादाय संघटनेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. त्यांना नियमानुसार ३० दिवसाची पुरेशी व वाजवी संधी देऊन तद्नंतरच पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील अशासकीय आयटीआय संस्थांना अनुदान देण्याबाबत

**(५०) * ३७१२० श्री.विक्रम काळे : तारांकित प्रश्न क्रमांक ३१७८७ ला दिनांक २ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सन २००१ पूर्वी मान्यता दिलेल्या अशासकीय आयटीआय संस्थांना अनुदान देण्याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केलेल्या गैरव्यवहाराबाबत

**(५१) * ३४७८६ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.विश्वास पाटील यांनी जुहूतील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत स्वतःच्या पत्नीला विकासकासोबत भागीदार करुन १६६१.६८ आणि १११९.५६ चौ. फूटाच्या तसेच ९२५.८० चौ.फूटाच्या टेरेससह दोन सदनिका आणि चार पार्किंगच्या जागा मिळविल्याचे प्रकरण निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, या गैरव्यवहाराबाबत गृहनिर्माण विभागाचे तत्कालीन सचिव श्री.सिताराम कुंटे यांनी चौकशी करावी अशी मागणी मुख्य सचिव यांचेकडे सन २००९ मध्ये केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुख्य सचिवांनी याप्रकरणी चौकशी करण्यासाठी हे प्रकरण कोकण विभागाच्या अतिरिक्त विभागीय आयुक्त यांचेकडे दिले, त्यानुषंगाने चौकशी पूर्ण झाली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या निष्कर्षानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे.

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश महेता :** (१) होय, सदर बाब सन २००९ मध्ये निदर्शनास आली होती.

(२) होय, हे खरे आहे.

(३), (४) व (५) अतिरिक्त आयुक्त, कोकण विभाग यांचेकडे प्राथमिक चौकशी करण्याचे काम सोपविण्यात आले होते. प्राथमिक चौकशी एप्रिल, २०१२ मध्ये पूर्ण झाल्याची माहिती आहे. प्राथमिक चौकशी अहवालाची प्रत उपलब्ध करुन देण्यास विभागीय आयुक्त कार्यालयास विनंती करण्यात आलेली आहे.

-----------------

# पुणे शहरातील महात्मा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्मारकांचा विस्तार करण्याबाबत

**(५२) * ३६१०८ श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील महात्मा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले या स्मारकांना जोडण्यासाठी रस्ता करण्यासाठी आणि तेथील नागरिकांचे पुनर्वसन करून या स्मारकांचा विस्तार करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक ७ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.पालकमंत्री, पुणे जिल्हा यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे शहरातील सावित्रीबाई फुले स्मारकातील शिल्पे व भित्तीचित्रे अपूर्णावस्थेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) प्रस्तुत प्रकरणाच्या अनुषंगाने मा.विधानपरिषद सदस्य यांनी मा.पालकमंत्री पुणे यांना दिनांक ३०/८/२०१७ रोजी निवेदन दिले आहे हे खरे आहे.

(२), (३) व (४)

- महात्मा फुले वाडा व क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले स्मारक यांना जोडणारा रस्ता व लगतच्या मिळकतींचे भूसंपादन करण्याचा प्रस्ताव पुणे महानगरपालिकेने विशेष भूसंपादन अधिकारी यांच्याकडे सादर केला आहे.
- संबंधित विशेष भूसंपादन अधिकारी यांच्याकडे पुणे महानगरपालिकेने भूसंपादनापोटी आवश्यक रक्कम जमा केलेली आहे.
- जिल्हाधिकारी, पुणे यांच्यामार्फत सामाजिक परिणाम निर्धारण अभ्यास अहवाल तयार करणाऱ्या अभिकरणाची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

- जागा संपादन करण्याच्या अनुषंगाने ४४ झोपड्यांचे पुनर्वसन करण्यात येत असून प्रकल्पबाधितांचे पुनर्वसन कात्रज व हडपसर/वारजे येथे करण्याची कार्यवाही सुरू आहे.
- तसेच अन्य बाधित खाजगी ६३ मिळकती मधील २०३ भाडेकरू व १४ दुकाने यांचे पुनर्वसन करण्यात येत आहे. पुनर्वसन करण्यासाठी आवश्यक ते करारनामे करणेबाबत कार्यवाही सुरू आहे.
- क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावरील आधारीत शिल्पे व भित्तीचित्रे करण्यासाठी निविदा काढून पुणे महानगरपालिकेकडून शिल्पकारास कामाची वर्क ऑर्डर सन २०१४ मध्ये देण्यात आली आहे.
- त्याप्रमाणे शिल्पकाराकडून शिल्पे व म्युरल्स तयार करण्याची कामे चालू आहेत.
- संबंधित शिल्पकाराकडून आजपर्यंत १२ पुतळे व २५ म्युरल्सचे कास्टिंग करण्यात आले असून त्यापैकी २ पुतळे व २० म्युरल्स प्रत्यक्ष कामाच्या जागेवर आणण्यात आली आहे. १० पुतळ्यांचे पॉलिशिंगचे काम सुरू आहे.

-----------------

## पुणे शहरात महानगरपालिकेने दलित वस्ती योजना सुधार निधीचा वापर न केल्याबाबत

**(५३) * ३५१५० ॲड.जयदेव गायकवाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरात महानगरपालिकेने दलित वस्ती योजना सुधार निधीचा वापर न केल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुसार दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२)

- पुणे महानगरपालिकेस लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजनेंतर्गत मागील तीन वर्षात रुपये १२ कोटी इतका निधी वितरीत केला आहे.
- वितरीत रुपये १२ कोटीच्या निधीतून ८८ कामांना मंजूरी देण्यात आली आहे.
- एकूण ८८ कामांपैकी ३१ कामे पूर्ण झाली असून ३५ कामे प्रगतीपथावर आहेत. त्यावर आतापर्यंत रुपये ४.४८ कोटी इतका प्रत्यक्ष खर्च झाला आहे.
- उर्वरीत २२ कामांची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून, कार्यादेश देण्याच्या प्रक्रियेत आहेत. कामांच्या प्रगतीनुसार देयके अदा करण्यात येत आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील समुद्र किनाऱ्यांवर जीवरक्षक तैनात करण्याच्या कंत्राट निविदांमध्ये झालेल्या गैरप्रकाराबाबत

**(५४) * ३५६५६ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रामनिवास सिंह, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील समुद्र किनाऱ्यांवर जीवरक्षक तैनात करण्याचे कंत्राट एका विशिष्ट कंपनीला देण्याच्या उद्देशाने निविदांमध्ये जाचक अटींचा समावेश करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील तीन वर्षांमध्ये रुपये तीन कोटी आर्थिक उलाढाल असलेल्या कंपनीला या निविदा प्रक्रियेत सहभागी होता येईल अशी अट घातल्यामुळे मुंबईतील बहुतांश जीवरक्षक संस्था बाद झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जीवरक्षक सेवा पुरविणाऱ्या कंपनी अथवा संस्थेकडे कोणती उपकरणे असणे आवश्यक आहे याचा उल्लेखही निविदा प्रक्रियेत न केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करून केवळ एका विशिष्ट कंपनीच्या फायद्यासाठी निविदा काढणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासन कोणती कारवाई करणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) जीवरक्षकांसाठी एका कंपनीवरच जीव अशा आशयाचे वृत्त माहे सप्टेंबर, २०१७ रोजीच्या दैनिक लोकसत्ता या वर्तमानपत्रात प्रसिध्द झाले होते, ही वस्तुस्थिती आहे.
(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत मुंबईतील सहा समुद्रकिनाऱ्यांवर तीन वर्षांकरिता जीवरक्षकांच्या सेवा पुरविण्याकरिता परिगणन करण्यात आलेल्या रुपये ११.१७ कोटी इतक्या अंदाजित रकमेच्या ३०% म्हणजेच रुपये ३.३५ कोटी एवढी आर्थिक उलाढाल आवश्यक असण्याची अट ई-निविदेमध्ये समाविष्ट करण्यात आली होती.
(३) व (४) जीवरक्षक सेवा पुरविणाऱ्या कंपनी अथवा संस्थेमार्फत लाईफ जॅकेट, रेस्क्यु ट्युब, रिंग बॉईज, रेस्क्यु रोप, रिचार्जेबल टॉर्चेस इत्यादी उपकरणे समुद्रकिनाऱ्यांवर उपलब्ध करुन देण्याबाबतची अट ई-निविदा प्रक्रियेत समाविष्ट करण्यात आली होती.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे-मुलुंड दरम्यानच्या विस्तारित रेल्वे स्थानकाच्या कामाबाबत

**(५५) * ३५७३७ श्री.रविंद्र फाटक, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे-मुलुंड दरम्यानच्या विस्तारित रेल्वे स्थानकासाठी ठाणे मनोरुग्णालयाची १४ एकर जागा ठाणे महानगरपालिका व रेल्वे प्रशासनास हस्तांतरीत करण्याबाबतचा प्रस्ताव अनेक वर्षांपासून शासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी राज्य शासन, ठाणे महानगरपालिका व रेल्वे प्रशासनस्तरावर सकारात्मक निर्णय झाल्याचे मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री तसेच मा.पालकमंत्री, ठाणे जिल्हा यांनी दिनांक १० ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास ठाणे येथे पत्रकार परिषद घेऊन जाहीर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार सदर विस्तारित रेल्वे स्थानकाचे काम माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान सुरु करण्यात येणार असल्याचेही मा.मंत्री महोदयांनी संयुक्तिकरित्या जाहीर केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर रेल्वे स्थानकासाठी हस्तांतरित करावयाच्या ठाणे मनोरुग्णालयाचे जमिनीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच रेल्वे स्थानकाचे काम सुरु करण्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) ठाणे-मुलुंड दरम्यानच्या विस्तारित रेल्वे स्थानकासाठी ठाणे मनोरुग्णालयाची १४.८३ एकर जागा ठाणे महानगरपालिका व रेल्वे प्रशासनास हस्तांतरित करण्याबाबत प्रस्ताव दिनांक ३० जुलै, २०१६ रोजी सार्वजनिक आरोग्य विभागास देण्यात आलेला होता. त्यानंतर पुन्हा सुधारित प्रस्ताव प्रधान सचिव, आरोग्य विभाग यांना दिनांक ०९ नोव्हेंबर २०१७ रोजी देण्यात आला आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) सदर विस्तारित रेल्वे स्थानकाच्या कामाचे सविस्तर आराखडे व अंदाज पत्रक तयार असून रेल्वे स्थानकाचे काम मनोरुग्णालयाची जागा हस्तांतरण करण्यात आल्यावर सुरु करणे शक्य होणार आहे.
(४) ठाणे महानगरपालिकेने सार्वजनिक आरोग्य विभागास ठाणे मनोरुग्णालयाची जागा हस्तांतरीत करणेसंदर्भात तीन पर्याय दिले आहेत. या पर्यायांबाबत सार्वजनिक आरोग्य विभाग स्तरावर कार्यवाही सुरु आहे. याप्रकरणी सार्वजनिक आरोग्य विभागाकडून जागा हस्तांतरीत होताच पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई इमारत व दुरुस्ती मंडळाने ना-हरकत परवानगी दिलेल्या प्रकल्पातील लोकांचे पुनर्वसन करण्याबाबत

**(५६) * ३५१८२ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त : दिनांक २ ऑगस्ट, २०१७ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ५ मधील प्रश्न क्रमांक २६६२१ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत दिनांक १ एप्रिल, २०१० ते दिनांक ३१ मार्च, २०१४ या कालावधीत जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकर प्राप्त इमारतींना पुनर्विकासासाठी दिलेल्या ना-हरकत परवानगीपैकी काम सुरु न झालेल्या किंवा अपुर्णावस्थेत असलेल्या ९०८ प्रकल्पातील १६६३ इमारतीमधील ३५८०२ भाडेकरूंसोबत विकासकांनी सहनिबंधक यांच्याकडे नोंदणीकृत करार केलेले नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त भाडेकरुंना संक्रमण घरासाठी द्यावयाचे भाडेही विकासकांनी देण्याचे थांबविले असून या पुनर्विकासासाठी ना-हरकत परवानगी दिलेल्या जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारती म्हाडा प्राधिकरणाने ८८(३)(अ) अन्वये धोकादायक ठरविल्यानंतरही अधिग्रहित करण्यात आलेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विकासासाठी ना-हरकत परवानगी दिलेल्या आणि पूर्ण कामे झालेल्या ३५३ प्रकल्पांमधील म्हाडाला द्यावयाची घरे ३३ विकासकांनी दिलेले नसून त्यांच्यावर फौजदारी कारवाई वा त्यांची मालमत्ता जप्त करण्यासाठी मुंबई इमारत व दुरुस्ती मंडळाने त्यांच्यावर कोणतीही कारवाई केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उपकरप्राप्त इमारतींमधील भाडेकरु/ रहिवाश्यांचे पुनर्वसन करण्याबाबत व ज्या विकासकांनी म्हाडास घरे दिलेली नाहीत त्यांच्यावर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश महेता :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळातर्फे दिनांक ०१ एप्रिल, २०१० ते दिनांक ३१ मार्च, २०१४ या कालावधीत उपकर प्राप्त इमारतींच्या पुनर्विकासासाठी उपलब्ध असलेल्या माहितीनुसार एकूण ४२७ योजनांसाठी ना-हरकत प्रमाणपत्र प्रदान केले आहेत. त्यामध्ये एकूण ६८२ उपकरप्राप्त इमारतीं व १५३२८ भाडेकरु/ रहिवाश्यांचा समावेश आहे. त्यापैकी ३३ योजनांचे काम पूर्ण झाले असून, अंदाजे ६३१ रहिवाश्यांचे नोंदणीकृत करारनामे करुन, पुनर्वसन करण्यात आलेले आहे. तसेच ३८७ योजनांचे काम प्रगतीपथावर किंवा सुरु झालेले नाही. त्यामधील १४२६१ भाडेकरु/रहिवाश्यांचे पुनर्वसन, कामे पूर्ण झाल्यानंतर व नोंदणीकृत करारनामे केल्यानंतर करण्यात येईल. तसेच ०७ योजनांचे ना-हरकत प्रमाणपत्र मंडळाने रद्द केले आहेत. त्यामध्ये ४३६ भाडेकरु/रहिवाश्यांचा समावेश आहे.

(२) होय, हे अशंत: खरे आहे. मंडळाने ना-हरकत प्रमाणपत्र प्रदान केल्यानंतर, काही विकासकांनी महानगरपालिकेच्या मंजूर नकाशानुसार कामे सुरु केली. परंतू अर्धवट अवस्थेत सोडले आहेत. विकासकांनी भाडेकरु/ रहिवाश्यांना पर्यायी जागेसाठी भाडे देणे बंद केले आहेत, अशा बंद पडलेल्या योजनांचा जलद पुनर्विकासाबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) व (४) हे अंशत: खरे आहे.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळातर्फे सन २०११ मध्ये ज्या योजनांमध्ये अतिरिक्त बांधकाम क्षेत्रफळ विकासकांकडून देय होते. अशा योजनांची संबंधित क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी पाहणी केली असता असे आढळून आले की, एकूण ३३ विकासकांनी योजना पूर्ण केल्या परंतू म्हाडास देय असलेले अतिरिक्त बांधकाम क्षेत्रफळ म्हाडास सुपूर्द केले नाही. या कारणास्तव मंडळाने २९ विकासकांविरुध्द संबंधित पोलीस ठाण्यात तसेच आर्थिक गुन्हे अन्वेषण विभागात रितसर गुन्हे नोंदविले आहेत. तद्नंतर मंडळाने पुन्हा अधिक ०५ विकासकांविरुध्द गुन्हे नोंदविले असल्याचे कळविले आहे.

तसेच ज्या विकासकांनी अतिरिक्त बांधकाम क्षेत्रफळ मंडळाकडे सुपूर्द केलेले नाही, अशा सर्व विकासकांची स्थावर अथवा जंगम मालमत्तांबाबतची माहिती सह उपनिबंधक-मुंबई शहर, जिल्हाधिकारी-ठाणे, शहर आणि उपनगरे व विकासकांच्या बँक खात्याबाबतची माहिती रिझर्व बँक ऑफ इंडिया यांच्या कार्यालयाकडून मागविण्यात येत आहे व सदर माहिती संकलित झाल्यानंतर, मा.जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांच्याकडे महसूल पुर्नप्राप्तीसाठी (Revenue Recovery Certificate) देण्यात येणार आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळात गैरप्रकार झाल्याबाबत

**(५७) * ३५४१२ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी व संबंधितांनी पदाचा व अधिकाराचा दुरूपयोग करून केलेल्या गैरप्रकाराची चौकशी करण्याबाबत तसेच त्यांना अटक करण्याबाबतची मागणी परभणी येथील स्थानिक लोकप्रतिनिधींनी सहपोलीस आयुक्त, पोलीस आयुक्तालय, औरंगाबाद यांच्याकडे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सह पोलीस आयुक्त, पोलीस आयुक्तालय, औरंगाबाद यांनी सर्व पुराव्यांची तपासणी करून दोषी अध्यक्ष, मुख्य कार्यकारी अधिकारी व संबंधितांविरूध्द गुन्हे नोंदवून त्यांना अटक केली आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

पोलीस आयुक्त, औरंगाबाद (शहर) यांच्याकडे निवेदन प्राप्त आहे.

(२) या प्रकरणी अल्पसंख्याक विकास विभागाने त्यांच्या दिनांक ११/८/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये सदर भाडेकरार रद्द करुन सदरची मालमत्ता वक्फ मंडळाकडे पुर्ववत करण्याविषयी कार्यवाही करण्याबाबत तसेच, सदर

वक्फ संस्थेच्या मौल्यवान मालमत्तेचे रक्षण करण्यास असमर्थ असलेल्या मुतवल्लीला कायदेशीर प्रक्रिया राबवून पदावरुन हटवून सदर वक्फ मालमत्ता वक्फ मंडळाच्या ताब्यात घेण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निदेश देण्यात आले आहेत.

तसेच, सदर प्रकरणी विधानसभेत दिलेल्या आश्वासनाच्या अनुषंगाने सदर प्रकरण चौकशीसाठी राज्य गुन्हे अन्वेषण विभागाकडे वर्ग करण्यात आले असून राज्य गुन्हे अन्वेषण विभागामार्फत चौकशी सुरु आहे.

(३) विलंब झालेला नाही.

-----------------

## मौजे विरार (ता.वसई, जि.पालघर) येथील पोलिसांकरिता आरक्षित असलेल्या जागेवर अनधिकृत बांधकाम केल्याबाबत

**(५८) * ३६९७९ श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे विरार (ता.वसई, जि.पालघर) येथील सर्व्हे नं. १६अ/१/१अ/ २/२पै, १६ इ, ४०६, १६अ/१/१अ/१पै. तसेच मौजे समेळ सर्व्हे नं. ४९, हिस्सा क्र. ८/४, या पोलिसांकरिता आरक्षित असलेल्या जागेवर जितेंद्र गोविंद पुजारी, सचिन वझे, निलेश ठाकूर, दिलीप आंबावकर इत्यादी व्यक्तींनी बनावट कागदपत्राच्या आधारे बोगस सी.सी. निर्माण करुन अनधिकृत बांधकाम केल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान स्थानिक रहिवाशी श्री.गोविंद गुंजाळकर यांनी लेखी पत्राव्दारे निदर्शनास आणले आहे, हे खरे आहे काय.

(२) असल्यास, संबंधित विकासकांवर बनावट कागदपत्राच्या आधारे अनधिकृत बांधकाम व एमआरटीपी ॲक्ट, १९६६ अन्वये महानगरपालिकेकडून अत्यंत गंभीर प्रकरणी तात्काळ गुन्हा दाखल करणे आवश्यक असताना देखील कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तदनुसार दोषी असलेल्या व्यक्तींवर व विकासकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे.

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) श्री.गोविंद गुंजाळकर यांचे या संदर्भातील सप्टेंबर महिन्यातील पत्र आढळून येत नसल्याचे वसई-विरार शहर महानगरपालिकेने कळविले आहे.

(२), (३) व (४) सर्वे क्र. १६अ/१/१अ/ २/२पै चे क्षेत्र २१७८० चौ.फुट इतके आहे व या क्षेत्रावर तळमजला + ३ माळ्याच्या चार इमारती सन १९८७ पासून अस्तित्वात आहेत. याप्रकरणी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम व महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियमातील तरतुदी अन्वये संबंधितांविरुध्द कारवाई करण्याच्या सूचना आयुक्त, वसई-विरार शहर महानगरपालिका यांना देण्यात आल्या आहेत.

सर्वे क्र. ४०६ चे क्षेत्र सुमारे १४००० चौ.फुट असून या क्षेत्रावर विरार पोलीस ठाण्याची इमारत अस्तित्वात आहे.

सर्वे क्र. १६अ/१/१अ/१पै चे क्षेत्र सुमारे १४००० चौ.फुट असुन या क्षेत्रावर पोलीस कर्मचाऱ्यांकरीता निवासस्थाने अस्तित्वात आहेत. सर्वे क्र. ४९, हिस्सा क्र. ८/४, चे क्षेत्र सुमारे ३६०० चौ.फुट असुन या क्षेत्रावर तळ मजला + ३ ची अनधिकृत इमारत अस्तित्वात आहे. सदर इमारतीस वसई-विरार शहर महानगरपालिकेने बांधकाम परवानगी किंवा भोगवटा प्रमाणपत्र दिलेले नाही. परंतु, विकासकाने बनावट कागदपत्रे वापरुन दुय्यम निबंधकाकडे दस्त नोंदणी केल्याचे आढळून आल्याचे वसई-विरार शहर महानगरपालिकेने कळविले आहे. महानगरपालिकेने महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियमातील तरतुदी अंतर्गत भोगवटदाराविरुध्द दिनांक २६/०८/२०१५ रोजी गुन्हा दाखल केला आहे.

या प्रकरणी बनावट कागदपत्रे तयार करुन दस्त नोंदणी केल्याचे निदर्शनास आल्याने संबंधित विकासकाविरुध्द भा.दं.वि. अंतर्गत फौजदारी गुन्हा दाखल करण्याच्या सूचना आयुक्त, वसई-विरार शहर महानगरपालिका यांना देण्यात आल्या आहेत.

-----------------

## मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या अधिकाऱ्यांनी कोटयवधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याबाबत

**(५९) * ३५८१० श्री.प्रविण दरेकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथे इमारत दुरुस्तीच्या नावाखाली मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या अधिकाऱ्यांनी तीन महिन्यात सुमारे ९२६ बनावट देयके तयार करुन कोटयवधी रुपयांच्या निधीत गैरव्यवहार केल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून याबाबत म्हाडाने चौकशी समिती स्थापन केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त चौकशी समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश महेता :** (१) होय.

कार्यकारी अभियंता/ई-२ विभाग, दुवपु मंडळ या विभागातील विशेष दुरुस्ती व चालु दुरुस्तीची मार्च, २०१७ ते जून, २०१७ पर्यंतच्या ९२६ देयकांबाबत सदर प्रकरण असून या प्रकरणी श्री.भरत गुर्जर यांनी मंडळाकडे केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने सदर ९२६ देयकांची सखोल चौकशी करण्यासाठी मुख्य अधिकारी, पुणे मंडळ व श्री.के.एल.काटवटे, कार्यकारी अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण कक्ष/प्राधिकरण यांची व्दिसदस्यीय समिती उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, प्राधिकरण यांचे आदेश क्र.प्राधि/खाचौ/२०१७/३६९५/प्र-९, दिनांक ३१/०८/२०१७ अन्वये स्थापन करण्यात आलेली आहे.

(२) या प्रकरणी व्दिसदस्यीय समितीमार्फत वरील प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने सध्या उपलब्ध अभिलेखाची छानननी करण्याचे काम सुरु असून, चौकशी प्रगतीपथावर आहे. अदयाप अहवाल अप्राप्त आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद शहरातील रस्त्यांच्या कामाच्या निविदा प्रलंबित असल्याबाबत

**(६०) * ३५२९३ श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरातील रस्त्यांसाठी घोषित केलेल्या रूपये १०० कोटींच्या कामांच्या निविदा प्रक्रियेमध्ये प्रलंबित असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कामांच्या निविदा अंतिम होऊन वर्कऑर्डर कधीपर्यंत काढण्यात येणार आहे,

(३) असल्यास, उक्त कामांसाठी शासन महानगरपालिकेला कधीपर्यंत निधी हस्तांतर करणार आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) औरंगाबाद महानगरपालिके अंतर्गतच्या रुपये ९९.८५ कोटी रकमेच्या रस्त्यांच्या कामांस दिनांक १९/०८/२०१७ रोजी शासन स्तरावरुन प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्याअनुषंगाने महानगरपालिकेने निविदा प्रसिध्द केल्या होत्या. दरम्यानच्या कालावधीत निविदा प्रकरणी मा.न्यायालयात याचिका क्र.१३०७४/२०१७ दाखल झाली होती. तथापि, निविदा प्रक्रिया थांबलेली नसून मा.न्यायालयाच्या निर्देशानुसार निविदा अंतिम करुन कार्यादेश देण्याची बाब अंतिम टप्प्यात आहे.

(३) प्रत्यक्ष कार्यारंभ झाल्यानंतर कामांच्या प्रगतीनुसार टप्प्या-टप्याने निधी वितरीत करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कल्याण-डोंबिवली महापालिकेतील सफाई कामगारांना किमान वेतन मिळणेबाबत

**(६१) * ३४७९६ श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महापालिकेत दिनांक १ जून, २०१५ रोजी वा त्यासुमारास समाविष्ट करण्यात आलेल्या २७ ग्रामपंचायतीच्या ४९९ सफाई कर्मचाऱ्यांना महापालिकेच्या कर्मचाऱ्यांप्रमाणे किंवा किमान वेतन कायदयाप्रमाणे वेतन देण्यात येत नसल्याने त्यांनी प्रशासनाच्या निषेधार्थ कामबंद आंदोलन करण्याचा इशारा माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान दिला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिका कर्मचाऱ्याप्रमाणे समान काम समान वेतन या धोरणाप्रमाणे उक्त कर्मचाऱ्यांना समान वेतन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेमार्फत २७ गावांतील ४९४ पात्र सफाई कर्मचाऱ्यांना किमान वेतन कायद्याप्रमाणे वेतन देण्याबाबत सर्वसाधारण सभा ठराव क्र. ५२, दिनांक ०५/१०/२०१७ अन्वये मान्यता देण्यात आली असून, सदर कर्मचाऱ्यांना किमान वेतन लागू करण्याबाबतची कार्यवाही महानगरपालिका स्तरावर सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांना औषधांचा पुरवठा करण्याबाबत

**(६२) * ३५५६८ ॲड.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.हरिसिंग राठोड, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.जनार्दन चांदूरकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये करण्यात येणारा औषधांचा पुरवठा अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे मागील १० महिन्यांपासून प्रलंबित असल्याने औषधांचा तुटवडा निर्माण झाल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे महापालिकेच्या रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या सर्वसामान्य रुग्णांना नाहक आर्थिक भुर्दंड पडत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रुग्णालयातील औषधांच्या तुटवडयाबाबत चौकशीची मागणी महापालिकेच्या स्थायी समिती सदस्यांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दिरंगाई करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कार्यवाही करून औषधांचा पुरवठा नियमित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) “औषध तुटवडा संपणार” अशा आशयाचे वृत्त माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये प्रसिध्द झाले होते ही वस्तुस्थिती आहे.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांत औषधांची टंचाई भासू नये याकरिता औषध पुरवठा करण्यासाठी कंत्राटात नेमून दिलेल्या कालावधीनंतरच्या ३ महिन्यांचा औषधसाठा ठेवण्याविषयी संबंधित अधिष्ठाता/रुग्णालय यांना परिपत्रकान्वये सूचना देण्यात आल्या होत्या. त्यामुळे रुग्णांना नाहक भुर्दंड पडत आहे हे खरे नाही.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांतील औषध पुरवठा अनुसूचीच्या विलंबाविषयी स्थायी समितीच्या सदस्यांनी चौकशीची मागणी केली आहे हे खरे आहे.

(४) सदर मागणीच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेचे संचालक (वैद्यकीय शिक्षण व प्रमुख रुग्णालय) व उपायुक्त (सार्वजनिक आरोग्य) यांच्यामार्फत चौकशी करण्यात येत आहे. औषध अनुसूचीच्या दरपत्रकांना स्थायी समितीची मान्यता प्राप्त झाली असून, प्रचलित पध्दतीनुसार औषधांचा पुरवठा सुरु करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हदगाव (जि.नांदेड) शहरात सार्वजनिक शौचालयांच्या निकृष्ट दर्जाच्या बांधकामाबाबत

**(६३) * ३७२६३ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सुभाष झांबड, श्री.हरिसिंग राठोड, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हदगाव (जि.नांदेड) नगरपालिकेने स्वच्छ भारत अभियानांतर्गत बांधलेल्या सार्वजनिक शौचालयाचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हदगाव शहरामध्ये सार्वजनिक स्वच्छतागृहांची व्यवस्था नसल्यामुळे नागरिकांची विशेषत: महिलांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन येथे सार्वजनिक शौचालयांची बोगस कामे करणाऱ्या कंत्राटदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, नागरिकांची गैरसोय दूर करण्याकरिता सार्वजनिक स्वच्छतागृह बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) स्वच्छ भारत अभियानांतर्गत हदगाव शहर हागणदारी मुक्त करण्यासाठी शहरातील ओ.डी. स्पॉट वर तात्पुरती व्यवस्था म्हणून एकूण ३० सीट्स प्रीकास्ट शौचालयांचे बांधकाम करण्यात आले आहे. त्यापैकी पुरूष व महिलांसाठी प्रत्येकी १५ सीट्स उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

या प्रीकास्ट शौचालयांपैकी काही शौचालयांचे दरवाजे व शौचालयांच्या भांड्याचे नुकसान करण्यात आल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये निदर्शनास आले होते. त्यानंतर त्यांची दुरूस्ती करून घेवून सदर शौचालये सध्या वापरात आहेत.

(२) स्वच्छ भारत अभियान (नागरी) अंतर्गत लाभार्थ्यास प्रामुख्याने वैयक्तिक घरगुती शौचालयाची सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला असून आता पर्यंत १७७६ लाभार्थ्यांना वैयक्तिक शौचालये मंजूर करण्यात आली आहेत. त्यापैकी १५८२ वैयक्तिक शौचालयांचे काम पूर्ण झाले आहे.

हदगाव शहरात पूर्वीची ५ सार्वजनिक शौचालये असून त्याची आवश्यक दुरूस्ती करून घेवून ती वापरात आहेत.

शहर हागणदारी मुक्त झाल्यानंतर मिळालेल्या प्रोत्साहन अनुदानातून शहरामध्ये ३ सार्वजनिक शौचालयाची बांधकामे प्रस्तावित आहे. यामध्ये एकूण १५ सीट्स असून त्यापैकी ८ सीट्स महिलांसाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) हदगाव शहरात पूर्वीची ५ सार्वजनिक शौचालये असून, १५ सीट्स असलेल्या ३ सामुदायीक शौचालयाचे बांधकाम प्रस्तावित आहे. सदर १५ सीट्स पैकी ८ सीट्स महिलांसाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## म्हाडाच्या सोडतीतील पात्र लाभार्थ्यांना सदनिकांचा ताबा देण्याबाबत

**(६४) * ३४९०५ ॲड.निरंजन डावखरे, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, आर्कि.अनंत गाडगीळ, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळाने सन २०१५ मध्ये मुंबई क्षेत्रासाठी तर सन २०१६ मध्ये कोकण म्हाडातर्फे विरार येथील बोळींज येथील गृहप्रकल्प विक्रीची जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याकरिता काढण्यात आलेल्या सोडतीत (lottery) यशस्वी व तद्नंतर पात्र ठरलेल्या विजेत्यांना ३ वर्षे होऊनही अद्याप सदनिकांचा ताबा देण्यात आलेला नसून त्यासाठी महापालिकेकडून ओसी मिळाली नसल्याचे कारण दिले जात असल्याचे दिनांक १३ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई क्षेत्रातील मालाड येथील योजनेकरिता अत्यल्प उत्पन्न गटातील १७० जण पात्र ठरले असून बँकेमार्फत गेल्या ८ महिन्यांपासून त्यांच्या गृहकर्जाचे हप्ते कापले जात असतानाही तसेच याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, गृहनिर्माण मंडळ वांद्रे, मा.गृहनिर्माण मंत्री तसेच प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग यांच्याकडे मागील १ वर्षापासून ते आजतागायत अनेकदा तक्रारी करुनही त्यांना अद्याप घरांचा ताबा देण्यात आला नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महापालिकांकडून म्हाडाच्या सदर गृहप्रकल्पांना भोगवटा प्रमाणपत्र (Occupation Certificate) प्राप्त न होण्याची कारणे काय आहेत व त्याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नूसार उक्त क्षेत्रातील पात्र लाभार्थ्यांना सदनिकांचा ताबा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश महेता :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळाच्या मालवणी मालाड, मुंबई येथील सन २०१५ च्या सोडतीमधील एकूण २३२ सदनिकांची जाहीरात प्रसिध्द केली होती. सदरहू प्रकरणात भोगवटा प्रमाणपत्र तांत्रिक बाबींमुळे उशिरा प्राप्त झाले आहे. सदरहू योजनेमध्ये अत्यल्प उत्पन्न गटा अंतर्गत २०४ अर्जदार पात्र ठरले. या २०४ अर्जदारांपैकी १६० अर्जदारांनी पूर्ण विक्री किंमत भरलेली आहे. सद्य:स्थितीत अद्यापपर्यंत ११२ अर्जदारांना सदनिकांच्या ताबा पत्राचे वितरण करण्यात आले असून १०५ अर्जदारांना प्रत्यक्ष ताबा देण्यात आला आहे. उर्वरित सदनिकांचे वितरण प्रगतीपथावर आहे.

(४) मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळाच्या मालवणी मालाड, मुंबई येथील इमारतीचे बांधकाम पूर्ण केल्यानंतर भोगवटा प्रमाणपत्र मिळविण्याकरीता दिनांक ०५/०६/२०१५ रोजी बृन्हमुंबई महानगरपालिकेकडे अर्ज केला. सदरहू भोगवटा प्रमाणपत्राकरीता महानगरपालिकेच्या विविध विभागांकडून ना-हरकत प्रमाणपत्र मिळाल्यानंतर दिनांक ०१/०९/२०१७ रोजी व दिनांक १२/१०/२०१७ रोजी महानगरपालिकेने भोगवटा प्रमाणपत्र वितरीत केले आहे.

तर विरार, बोळींज या वसाहतीत परिपूर्ण असलेले अग्निशमन केंद्र व ७० मी. उंचीची Turn Table Ladder म्हाडामार्फत उपलब्ध करुन देण्याबाबत महानगरपालिकेने अट घातली आहे. म्हाडामार्फत अग्निशमन केंद्र बांधण्यात येत असून TTL साठी महानगरपालिकेकडे रुपये २०.४४ कोटी इतक्या रकमेचा भरणा दिनांक ०२/११/२०१७ रोजी केला आहे. भोगवटा प्रमाणपत्राकरीता पाठपुरावा सुरु आहे.

(५) व (६) मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळाच्या प्रकरणामध्ये सद्य:स्थितीत ११२ लोकांना सदनिकेचा ताबा पत्राचे वितरण करण्यात आले. त्यापैकी १०५ लाभार्थ्यांनी सदनिकेचा प्रत्यक्ष ताबा घेतला आहे. उर्वरित सदनिकेचा ताबा वितरण प्रक्रिया प्रगती पथावर आहे. तर कोकण गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळाच्या विरार, बोळींज प्रकरणांमध्ये भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झाल्यावर पात्र लाभार्थ्यांना सदनिकांचा ताबा देण्याची कार्यवाही करण्यात येईल, असे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण यांनी कळविले आहे.

-----------------

## अकोला येथील शिवनी विमानतळाच्या धावपट्टीचे विस्तारीकरण करण्याबाबत

**(६५) * ३६४५४ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला येथील शिवनी विमानतळाच्या धावपट्टीच्या विस्तारीकरणाकरिता भूसंपादन व इतर खर्चाकरिता लागणारा १०९ कोटी रुपयांचा निधी शासनाने मंजूर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात अनेकदा बैठका होऊन तसेच निधीची तरतूद होऊनही खाजगी भूसंपादनाच्या कारवाईला सुरुवात झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त विमानतळावर रात्रीच्या लँडीगकरिता कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस** : (१) अकोला येथील शिवणी विमानतळाच्या विस्तारीकरणाबाबत जागेची मोजणी करण्यासाठी शासनामार्फत रुपये २५ लक्ष निधी जिल्हाधिकारी, अकोला यांना उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

(२) व (३) अकोला येथील शिवणी विमानतळाच्या विस्तारीकरणासाठी भूसंपादन प्रस्ताव सादर करण्याबाबत भारतीय विमानपत्तन प्राधिकरणाला कळविण्यात आले आहे. सदर प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर प्रत्यक्षात भूसंपादन होऊ शकेल. तसेच, भूसंपादन झाल्यानंतर भारतीय विमानपत्तन प्राधिकरणामार्फत विमानतळावर नाईट लँडीग सुविधा उपलब्ध करण्याबाबत नियोजित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उल्हासनगर (जि.ठाणे) येथील अनधिकृत बांधकामे नियमित करण्याबाबत

**(६६) * ३७१९९ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.आनंदराव पाटील, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सुभाष झांबड** : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) येथील अनधिकृत बांधकामे नियमित करण्यासाठी मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार राज्य शासनाने दिनांक १४ सप्टेंबर, २००६ रोजी वा त्यासुमारास आदेश देऊन १० वर्षाहून अधिक कालावधी होऊनही सदरहू बांधकामे नियमित करण्याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उल्हासनगर येथील अनधिकृत बांधकामे शासनाने दिलेल्या आदेशानुसार नियमित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) उल्हासनगर शहरातील दिनांक १/१/२००५ पुर्वीची अनधिकृत बांधकामे नियमानुकूल करण्यासंदर्भात शासनाने उल्हासनगर शहरातील अनधिकृत विकासकामे नियमाधिन करणे अधिनियम, २००६ पारीत केला आहे. सदर अनधिकृत बांधकामे नियमाधिन करण्यासाठी जिल्हाधिकारी, ठाणे यांची पदनिर्देशित प्राधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली असून, त्यांच्या अधिपत्याखाली तज्ञ समिती गठीत करण्यात आली आहे. सदर अधिनियमांतर्गत, ज्या मिळकत धारकांनी परिपुर्ण प्रस्ताव सादर केले, त्या प्रस्तांवाची तज्ञ समितीकडून छाननी झाल्यानंतर पदनिर्देशित प्राधिकारी तथा जिल्हाधिकारी, ठाणे यांचे मान्यतेने प्रस्तावधारकांना प्रशमन फी व विकास आकार तसेच शासकीय जमिनीचे शुल्क भरण्यासंबंधी नोटीस पाठविण्यात आल्यानंतर २००१ प्रस्तावाधारकांपैकी १७५ प्रस्तावात पुर्ण रक्कम म्हणजे प्रशमन फी व विकास आकार भरणा करण्यात आली असून त्यापैकी ९७ प्रकरणात प्रस्तावधारकांना डी फॉर्म (अंतिम प्रमाणपत्र) निर्गमित करण्यात आले आहे.

उक्त अधिनियमामध्ये बांधकामाच्या भक्कमतेबाबतचे व अग्निशमन सुरक्षा उपाय योजनाबाबत प्रमाणपत्र प्रस्तावधारकांना सादर करणे आवश्यक आहे. मात्र सदरच्या इमारती या ३० ते ४० वर्षापुर्वीच्या असून सदरचे प्रमाणपत्र सादर करण्यास प्रस्तावधारकांना अडचणीचे होत आहे. तसेच सदरची बांधकामे ही दाटीवाटीने सामासिक अंतरे न सोडता बांधलेली आहेत. तसेच अस्तित्वातील इमारतीमध्ये अग्निशमन सुविधा उपलब्ध नाही, त्याचप्रमाणे अग्निशमन सुविधा निर्माण करण्याचा प्रयत्न केल्यास त्याठिकाणी जागा उपलब्ध नाही, त्यामुळे या दोन बाबींची पुर्तता न झाल्यामुळे नियमाधीन प्रकरणे प्रलंबित आहेत.

-----------------

## कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीत स्वच्छतागृहे बांधण्याबाबत

**(६७) * ३७२५९ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या अखत्यारितील भागात उघड्यावर प्रातविधी करणाऱ्या कुटुंबांसाठी स्वच्छतागृहे बांधण्याच्या सूचना सदरहू महापालिकेला शासनाच्या नगरविकास विभागाने दिल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिका हद्दीतील उघड्यावर प्रातविधी करणाऱ्या ४,६८० कुटुंबांसाठी स्वच्छतागृहे बांधण्यासाठी शासनाने १ कोटी ४८ लाख रुपयांचा निधी महापालिकेला दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हे काम दिनांक ३१ मे, २०१६ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित असतानाही फक्त २२ टक्के काम झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून विहित कालावधीत काम पूर्ण न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच या कामाची सद्य:स्थिती काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

स्वच्छ भारत अभियान (नागरी) च्या धर्तीवर दिनांक १५ मे, २०१५ पासून राज्यात राबविण्यात येणाऱ्या स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत उघड्यावर शौचास जाणाऱ्या कुटुंबांना शौचालयाची सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

(२) स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील, सन २०११ च्या जनगणनेनुसार उघड्यावर शौचास जाणाऱ्या ४,६८० कुटुंबांना शौचालयाची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र व राज्य शासनाचा मिळून एकूण रुपये ४.६५५८ कोटी एवढा निधी वितरीत करण्यात आला आहे.

(३) हे खरे नाही.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने आतापर्यंत १२३८ वैयक्तिक घरगुती शौचालयांची कामे पूर्ण केली आहेत. तर, ज्या कुटुंबांना वैयक्तिक शौचालयाची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी जागा उपलब्ध नाही अशा कुटुंबांसाठी ६ ठिकाणी एकूण २८ सीटस् ची सार्वजनिक शौचालये बांधण्यात आली असून २ ठिकाणी प्रत्येकी २५ सीटस् च्या सार्वजनिक शौचालयांचे बाधकाम सुरू आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कळंबोली (जि.रायगड) येथील शासकीय गोदामात धान्याचा गैरव्यवहार झाल्याबाबत

**(६८) * ३५६३३ श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण मधील ५ रेशनिंग दुकानात वितरीत करण्यासाठी कळंबोली (जि.रायगड) येथील शासकीय गोदामातून दिनांक १२ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास गव्हाच्या २०० गोणी घेऊन एक ट्रक कल्याणकडे जात असताना तो दुकानात न नेता गैरव्यवहार करणाऱ्यांनी इतर ठिकाणी नेण्याचा प्रयत्न केल्याचे निदर्शनास आले असून सदरहू ट्रक खडकपाडा पोलिसांनी ताब्यात घेऊन ट्रक चालक चंद्रकांत शिंदे याला अटक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाकडून गरिबांसाठी येणाऱ्या धान्याचा गैरव्यवहार होत असून अनेकदा कारवाई होऊनही अशा प्रकारचा गैरव्यवहार सुरु असल्याने यामध्ये शासकीय यंत्रणेचा सहभाग असल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तदनुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) सदरचा ट्रक हा मुद्देमालासह पोलिसांनी पकडल्यानंतर खडकपाडा पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. ll २९/२०१७ कलम ३, ७ जिवनावश्यक वस्तु अधिनियम, १९५५ अन्वये दिनांक १२/१०/२०१७ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे व आरोपीस अटक करण्यात आली आहे. सदर प्रकरणाचा तपास सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र सुरक्षा बल महामंडळातील सुरक्षा रक्षकांच्या विविध मागण्यांबाबत

**(६९) * ३५७९५ श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर, अॅड.राहुल नार्वेकर, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.जयवंतराव जाधव, अॅड.निरंजन डावखरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अनिल भोसले, श्री.प्रविण दरेकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार, डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.बाळाराम पाटील, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामनिवास सिंह, प्रा.अनिल सोले, श्री.परिणय फुके, श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाच्या सुरक्षा रक्षकांनी वेतनवाढीसह कायमस्वरुपी नोकरीची हमी या मागण्यांसाठी दिनांक १९ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास संप केला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विविध मागण्यांसाठी संपावर गेलेल्या ४५० सुरक्षा रक्षकांना महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाने माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान सेवेतून बडतर्फ केले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार सुरक्षा रक्षकांच्या मागण्या मान्य करण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.
(२) संपात प्रत्यक्ष सहभाग आढळून आलेल्या एकूण १९०४ सुरक्षारक्षकांचे कंत्राट रद्द करण्यात आले आहे.
(३) सुरक्षारक्षकांना मासिक मोबदल्या व्यतिरिक्त भविष्य निधी, राज्य कामगार विमा योजना, अर्जित रजा, उत्सवानिमित्त सानुग्रह अनुदान, रुपये ३ लाखाचा मेडीक्लेम, सुरक्षारक्षकांचे आकस्मित निधन झाल्यास त्यांच्या कुटुंबियांना रुपये १५ लाख एवढया रक्कमेचा विम्याचा लाभ दिला जातो.

महाराष्ट्र सुरक्षा महामंडळातील सुरक्षारक्षकांची मुख्य मागणी त्यांना पोलीस दलातील कर्मचाऱ्याप्रमाणेच वेतन व सोयी सुविधा उपलब्ध व्हाव्यात अशी आहे. तथापि, महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळातील सुरक्षारक्षक यांना कंत्राटी पध्दतीने नेमले असल्याने त्यांना पोलीस दलातील कर्मचाऱ्यानुसार वेतन व सोयी सुविधा उपलब्ध नाहीत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे येथील मुळा-मुठा नदी संवर्धनासाठी जायका प्रकल्पांतर्गत सांडपाणी शुध्दीकरण प्रकल्प उभारण्याबाबत

**(७०) * ३५२५० श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, अॅड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे येथील मुळा-मुठा नदी संवर्धनासाठी जायका प्रकल्पांतर्गत सांडपाणी शुध्दीकरण प्रकल्प उभारण्यासाठीच्या भूसंपादनाचे काम संथगतीने सुरु असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार या प्रकल्पासाठी आवश्यक भूसंपादन करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) मा.मंत्री (पर्यावरण, वन तथा जलवायू परिवर्तन, केंद्र शासन) यांनी जायका प्रकल्पासाठी सुरू असलेल्या भूसंपादनाच्या संथ कार्यवाहीबाबत स्थानिक लोकसभा सदस्यांना दिनांक २८/७/२०१७ रोजी पत्रव्यवहार केलेला आहे हे खरे आहे.

भूसंपादनासाठी आवश्यक रक्कम उपलब्ध नसणे व अन्य तांत्रिक, प्रशासकीय अडचणींमुळे भूसंपादनाच्या कार्यवाहीस विलंब झाला आहे, ही वस्तुस्थिती आहे.

वारजे व वडगांव बुद्रुक या प्रकल्पासाठीची रक्कम जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे भरणा केलेली असून मुंढवा प्रकल्पासाठीची रक्कम भरण्याची कार्यवाही सुरू आहे.

-----------------

## नागपूर येथील मिहान प्रकल्पामधील रामदेव बाबा यांना दिलेली जमीन ताब्यात घेण्याबाबत

**(७१) * ३६०४५ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील मिहान प्रकल्पामधील रामदेव बाबा यांच्या फूड पार्कसाठी ६०० कोटी रुपयांची जमीन अल्पदरात दिली असून येथील एक एकर जमिनीचे दर १०० कोटी असताना रामदेव बाबा यांना २५ लाख रुपये प्रति एकर या दराने जमीन दिली ही माहिती अधिकारावरील सुनावणी दरम्यान माहिती देणाऱ्या व कागदपत्रे उपलब्ध करणाऱ्या श्री.समीर गोखले व श्री.अतुल ठाकरे या दोन अधिकाऱ्यांची बदली केल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहिती अधिकार कायद्याचे पालन करत असलेल्या अधिकाऱ्यांना अशाप्रकारे दंडीत केल्याप्रकरणी माहिती अधिकार कार्यकर्त्यांनी विरोध दर्शविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रामदेव बाबा यांच्या फुड पार्कसाठी अल्प दरात दिलेल्या जमिनीवर सदरील प्रकल्प अजूनही उभारण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकल्पाव्दारे विदर्भात रोजगार उपलब्ध होत नसल्यामुळे रामदेव बाबा यांना दिलेली जमीन ताब्यात घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) पतंजली फूड पार्कसाठी निविदा प्रक्रिया राबवून वितरीत करण्यात आलेल्या जागेसंबंधी माहिती अधिकार अधिनियमांतर्गत प्राप्त झालेल्या अर्जाची हाताळणी जनमाहिती अधिकारी/ अपिलीय अधिकारी या नात्याने श्री.समीर गोखले व श्री.अतुल ठाकरे यांनी केलेली नाही. त्यामुळे, त्यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही.

तसेच, श्री.समीर गोखले व श्री.अतुल ठाकरे यांच्या बदल्या या प्रशासकीय कारणास्तव करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे माहिती अधिकाराखालील सुनावणी व सदर अधिकाऱ्यांची बदली यांचा अन्योन्य संबंध नाही.
(३) व (४) मिहानमध्ये पतंजली फूड पार्कचे काम प्रगतीपथावर असून दिलेल्या वेळेत बांधकाम व उत्पादन सुरु केल्यास या प्रकल्पाव्दारे येत्या दोन वर्षांत विदर्भात रोजगार उपलब्ध होऊ शकेल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सांजा (ता.जि.उस्मानाबाद) येथील सोयाबीन पिकाची चोरी झाल्याबाबत

**(७२) * ३६०३८ श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांजा (ता.जि.उस्मानाबाद) येथील शेतकऱ्यांच्या शेतातील सोयाबीनचे पीक गावातील काही अज्ञात व्यक्ती चोरुन नेत असल्याची तक्रार आनंदनगर पोलीस स्टेशन, उस्मानाबाद येथे करण्यास श्री.विक्रम सुर्यवंशी व इतर शेतकरी गेले असता पोलीस निरीक्षक यांनी तक्रार दाखल करुन घेतली नसल्याचे दिनांक ५ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाबाबत जिल्हा पोलीस अधिक्षक, उस्मानाबाद यांच्याकडे तक्रार केली असता पोलीस अधिक्षकांनी तक्रार नोंदविण्याचे स्पष्ट आदेश देऊनही पोलीस निरीक्षकांनी फिर्याद नोंदवून घेतली नाही परंतु पोलीस महानिरीक्षक, औरंगाबाद यांच्याकडे रितसर तक्रार केल्यानंतर आनंद नगर पोलीस स्टेशनमध्ये फिर्याद नोंदविण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरची फिर्याद नोंदविताना पोलीस निरीक्षक यांनी कर्तव्यात कसूर करुन जाणीवपूर्वक त्रुटी ठेवून आरोपींच्या हिताखातर कलम दाखल करताना अक्षम्य दुर्लक्ष केले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार संबंधित दोषींवर व त्यांना पाठीशी घालणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) दिनांक ०५/१०/२०१७ रोजी श्री.विक्रम सुर्यवंशी यांनी शेतातील पीक चोरीला गेले असल्याचा तक्रारी अर्ज दिलेला होता.

सदर बाब तंटामुक्त समिती मार्फत सोडविण्याचा प्रयत्न केला गेला, मात्र वाद मिटून तक्रारदार यांना त्यांचे पीक परत मिळाले नाही, म्हणून दिनांक २४/१०/२०१७ रोजी पोलीस स्टेशन आनंदनगर, उस्मानाबाद येथे गु.र.नं. २४४/२०१७ भा.दं.वि.क. ३७९, ४४७, ३२३, ५०४, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२) सदर तक्रार प्राप्त झाल्यानंतर त्याची प्राथमिक तपासणी करता, सांजा गावातील सुमारे १८०० एकर जमीन ही श्रीराम ट्रस्ट तडवळे ता.जि.उस्मानाबाद यांचे मालकीची असुन, त्यातील काही क्षेत्राचे जमीनबाबत सांजा येथील शेतकऱ्यांमध्ये आपसात वाद असल्याने, सन २०१२ मध्ये तत्कालिन जिल्हाधिकारी यांनी सात बारा उताऱ्यावरील वहीवाट करणाऱ्या शेतकऱ्यांची नावे कमी करून, सातबारे कोरे केले होते. शेतीच्या वादाबाबत मा.जिल्हा न्यायालय, उस्मानाबाद येथे दिवाणी दावा दाखल आहे.

उक्त प्रकरणातील तक्रारदार व आरोपी हे सख्ये चुलत भाऊ असल्याने, सदरबाब तंटामुक्त समिती मार्फत सोडविण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र तरीही वाद न मिटल्याने सदर प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला.

(३) व (४) तक्रारदार यांचा वाद आपापसात न मिटल्याने पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हाचा तपास चालु असुन, पोलीस अधिकारी यांनी कोणालाही पाठीशी घातल्याचे दिसुन येत नाही.

(५) विलंब झाला नाही.

-----------------

## मुंबईतील साकीनाका परिसरातील रहिवाशांची विकासकाने फसवणूक केल्याबाबत

**(७३) * ३५९६१ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील साकीनाका परिसरातील चांदीवली फर्म येथील शिवभक्ती इमारती जवळील भारतनगर कंपाऊंड मधील झोपडयांचा पुनर्विकास करण्याच्या नावाखाली विकासकाने रहिवाशांची फसवणूक केली असल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विकासकाने रहिवाशांची फसवणूक केल्याने येथील रहिवाशी मुंबई आणि ठाणे येथील पुलाखाली वास्तव्य करुन राहत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विकासकाने फसवणूक केल्याने संतप्त झालेल्या या रहिवाशांनी मंत्रालयासमोर झोपडया उभारण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर दोषी विकासकावर कारवाई करुन उक्त परिसरातील रहिवाशांना हक्काचे घर मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश महेता :** (१), (२), (३), (४) व (५) हे खरे नाही, तथापि श्री.रवि रामधनी यादव यानी चांदीवली फर्म शिवभक्ती इमारत जवळ भारतनगर कंपाऊंड या परिसरात पश्मिना डेव्हलपर्स यांनी मुंबई महानगरपालिका यांचे मदतीने केलेल्या झोपडयाच्या निष्कासनाबाबत मंत्रालय लोकशाही दिनात अर्ज सादर केला आहे. सदर तक्रार अर्जाच्या अनुषंगाने झालेल्या सुनावणीनुसार अपर जिल्हाधिकारी (अति./निष्का.), पुर्व उपनगरे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने तक्रारदाराच्या तक्रारीच्या अनुषंगाने तक्रारदारास पुरेशी संधी देऊन सुनावणीची कार्यवाही केली व तपशिलवार अहवाल गृहनिर्माण विभागास सादर केला आहे. सदर समितीचा प्राप्त अहवाल गृहनिर्माण विभागाव्दारे शासनाच्या निदर्शनास आणून देण्यात आला आहे.

-----------------

## शासकीय सेवांमधील पदोन्नतीतील आरक्षण रद्द करण्याच्या मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाबाबत

**(७४) * ३४९१७ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अनुसूचित जाती-जमाती, विशेष मागास वर्ग, भटक्या विमुक्त जाती-जमातीना राज्य शासकीय सेवांमधील पदोन्नतीत आरक्षण लागू करण्यासाठी शासनाने सन २००१ मध्ये केलेला कायदा व त्याच्या अंमलबजावणीसाठी दिनांक २५ मे, २००४ रोजी निर्गमित केलेला शासन निर्णय घटनाबाहय असल्याचा निर्णय मा.उच्च न्यायालयाने दिनांक ४ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास दिलेला असून या निर्णयाच्या आधारे गेल्या १३ वर्षापासून दिलेल्या पदोन्नत्या रद्द ठरविलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.उच्च न्यायालयाच्या उक्त निर्णयामुळे मागासवर्गीयांवर अन्याय होणार असून गेल्या १३ वर्षांपासूनच्या पदोन्नत्या रद्द ठरविल्या असल्यामुळे मोठया प्रमाणात प्रशासकीय अडचणी निर्माण होणार असल्याने यानुषंगाने मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यासंदर्भात व निर्णयास स्थगिती मिळविण्यासाठी कोणता निर्णय घेण्यात आला व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) पदोन्नतीचे आरक्षण रद्द करण्याबाबत मा.उच्च न्यायालयाने याचिका क्र.२७९७/२०१५ मध्ये दिनांक ४/८/२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका क्र. २८३०६/२०१७ दाखल केली असून, मा.सर्वोच्च न्यायालयात राज्य शासनाच्यावतीने प्रभावी बाजू मांडण्यासाठी जेष्ठ विधीज्ञ श्री.हरिश साळवे, श्री.फली नरिमन, श्री.के.के. वेणूगोपाल, ॲटर्नी जनरल ऑफ इंडिया व श्रीराम पिंगळे ॲडव्होकेट ऑन रेकॉर्ड, सर्वोच्च न्यायालय यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ संदर्भात दिनांक ३०/१०/२०१७, दिनांक १३/११/२०१७ व दिनांक १५/११/२०१७ रोजी झालेल्या सुनावण्यांच्या वेळी मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाच्या दिनांक ४/८/२०१७ च्या निर्णयास कोणतीही स्थगिती दिलेली नाही अथवा परिस्थिती “जैसे थे” ठेवण्याबाबत देखील कोणतेही आदेश दिलेले नाहीत. पुढील सुनावणीचा दिनांक ४/१/२०१८ असा आहे. सद्य:स्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अमरावती शहरातील शासकीय विदर्भ ज्ञानविज्ञान संस्थेच्या मुलींच्या वसतिगृहातील रॅगिंग प्रकरणाबाबत

**(७५) * ३४६७४ श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती शहरातील शासकीय विदर्भ ज्ञानविज्ञान संस्थेच्या मुलींच्या वसतीगृहातील वरिष्ठ वर्गात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थीनींनी कनिष्ठ वर्गातील विद्यार्थीनींवर रॅगिंग केल्याचा प्रकार माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला असून याप्रकरणी पाच मुलींना अटक करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषी विद्यार्थीनी व सर्व संबंधिताविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

नमूद गुन्ह्यातील सहा आरोपींना दिनांक ०२/०९/२०१७ रोजी पोलिसांमार्फत मा.न्यायालयात हजर राहण्याच्या अटीवर समजपत्र देवुन सोडण्यात आले आहे.

(२) फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून गाडगे नगर पोलीस स्टेशन, अमरावती शहर येथे अप क्र. ६१३/२०१७, भा.दं.वि.सं. कलम ३४१, ३४२, ३५४ सह महाराष्ट्र छळवाद प्रतिबंधक अधिनियम, १९९९ कलम ४ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. सहा आरोपी मुलींना वसतिगृहातून निष्कासित केले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## काटोल (जि.नागपूर) नगरपरिषदेमधील गैरव्यवहाराबाबत

**(७६) * ३७३०९ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) काटोल (जि.नागपूर) नगरपरिषदेमधील भुडकानाला व मातंगपुरा येथील घरकुल गैरव्यवहाराची जिल्हाधिकारी, नागपूर यांचेमार्फत चौकशी करून तत्कालीन अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्यावर नगरपालिका कायद्याचे कलम ५५ (ब) प्रमाणे अपात्रतेची कारवाई करून फौजदारी गुन्हे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान नोंदविण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भुडकानाला विकास आराखडयातील आरक्षण क्र.२४ हे खेळाचे मैदानाकरीता आरक्षित असतानाही नियमांचे उल्लंघन करून तत्कालिन अध्यक्ष व उपाध्यक्ष यांनी निकृष्ट दर्जाचे घरकुलाचे बांधकाम केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, काटोल नगरपरिषदेने शासकीय निधीचा सुमारे १ कोटी २० लाख रूपयांचा गैरव्यवहार करून सदर कामाची निविदा न काढता मुख्याधिकारी व नोंदणीकृत नसलेल्या ठेकेदारांकडून शासनाच्या निधीचा अपव्यय केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) अपात्रतेची कारवाई वा फौजदारी गुन्हे दाखल करण्याची कार्यवाही करण्यात आलेली नाही. अशी कार्यवाही व्हावी यासाठी, श्री.राजेश राठी, सदस्य, काटोल नगरपरिषद यांची तक्रार कार्यवाहीबाबतच्या मागणीसह सन्माननीय विधानपरिषद सदस्य श्री.जयंत पाटील यांच्याकडून शासनास प्राप्त झाली आहे.

(२) खेळाच्या मैदानासाठी आरक्षित जागा निवास उपयोगी क्षेत्रात रुपांतर करण्याचा ठराव नगरपरिषदेने दिनांक १९/०६/२०१० रोजी मंजूर केला असून, आरक्षण फेरबदलाचा प्रस्ताव महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७ नुसार शासनास सादर केला आहे. शासनस्तरावर या प्रस्तावावर कार्यवाही सुरु आहे.

सदर बांधकामाच्या गुणवत्तेची तपासणी नागपूर महानगरपालिकेच्या कैंद्रिय गुणवत्ता नियंत्रण प्रयोग शाळेतून केली असून, त्यांच्या अहवालानुसार तसेच, थर्ड पार्टी ऑडीटनुसार बांधकाम योग्य दर्जाचे झाल्याचे दिसते.

(३) व (४) एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमांतर्गत ही कामे झाली. घरकुलाच्या बांधणीसाठी केंद्र शासनाने ठरविलेल्या दरानुसार, प्रती घरकुल रुपये ८०,०००/- एवढी किंमत निश्चित करण्यात आली होती. या किंमतीत काम करण्यास ४ वेळा निविदा मागवूनही कुणीही निविदाकार तयार झाला नाही. वाल्मिकी आंबेडकर आवास योजनेअंतर्गत (VAMBAY) घरकुल कामासाठी पात्र कंत्राटदारापैकीही कोणीही कंत्राटदार हे काम करण्यास तयार झाला नाही.

सबब, मुख्य अभियंता तथा राज्यस्तरीय समन्वय अधिकारी (JNNURM) यांनी दिनांक ०२/०३/२००९ च्या पत्रान्वये कळविलेल्या सूचनानुसार याप्रकरणी ठेकेदारांकडून कामे करुन घेण्यात आली.

जिल्हाधिकारी यांच्या प्राप्त अहवालावरुन गैरव्यवहार वा निधीचा अपव्यय झाल्याचे दिसून येत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई शहरात हॉटेल्स बांधण्यासाठी किमान भूखंड क्षेत्राची अट रद्द करण्याच्या प्रस्तावाबाबत

**(७७) * ३६३६६ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध पर्यटन क्षेत्रांचा विकास करण्यासाठी पर्यटन विभागाने दिनांक ४ मे, २०१६ रोजी जाहिर केलेल्या महाराष्ट्र नवीन पर्यटन धोरणाच्या अनुषंगाने पर्यटन उद्योगाला चालना देण्यासाठी अंतर्भूत असलेल्या विविध योजना, आर्थिक सवलती या माध्यमातून मुंबई शहरात तीन, चार व पंचतारांकित हॉटेल्स बांधण्यासाठी किमान भूखंड क्षेत्राची अट रद्द करण्याचा प्रस्ताव राज्य शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने बृहन्मुंबई क्षेत्राच्या विकास नियंत्रण नियमावलीत बदल केला आहे काय व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) व (३) या अनुषंगाने शासनाने बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली, १९९१ मध्ये महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१अेअे) अन्वये शासनस्तरावरुन फेरबदल कार्यवाही सुरु केलेली आहे. प्रस्तावित फेरबदलाबाबत नागरिकांच्या सूचना/हरकती मागविणारी सूचना दिनांक १३/१०/२०१७ रोजी प्रसिध्द करणेत आलेली आहे.

-----------------

## नागपूर महानगरपालिकेत ऐवजदार कर्मचारी दाखवून केलेल्या गैरव्यवहाराबाबत

**(७८) * ३५१५५ ॲड.जयदेव गायकवाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महानगरपालिकेमध्ये मोठया प्रमाणात ऐवजदार कर्मचारी दाखवून करोडो रुपयांचा गैरव्यवहार होत असल्याबाबत सामाजिक कार्यकर्त्यांनी मा.मुख्यमंत्री व महानगरपालिका आयुक्त, नागपूर यांच्याकडे दिनांक १९ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निवेदनाव्दारे लक्ष वेधले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) अशा प्रकारचे कोणतेही निवेदन प्राप्त झालेले नाही.

(२) नागपूर महानगरपालिकेतील स्थायी सफाई कामगार रजेवर, गैरहजर असल्यास किंवा पद रिक्त असल्यास, त्या जागेवर ऐवजदार सफाई कामगारांची नियुक्ती करण्यात येते.

ऐवजदार सफाई कामगारांना महिन्यातून २६ दिवसांचे काम देण्यात येते. त्यांना किमान वेतन अधिनियमानुसार वेतन देण्यात येत असून, त्यांचे वेतन त्यांच्या बँक खात्यामध्ये थेट जमा करण्यात येते. त्यामुळे गैरव्यवहार होण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील मालाड (पश्चिम) परिसरातील राठोडी गावातील समस्या सोडविण्याबाबत

**(७९) * ३५६६६ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रामनिवास सिंह, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मालाड (पश्चिम) परिसरातील राठोडी या गावामध्ये ठिकठिकाणी कचऱ्याचे ढिग जमा झाले असून सांडपाण्याचा निचरा होत नसल्याने गटारे तुंबली असून सर्वत्र दुर्गंधी पसरली असणे त्याचप्रमाणे मच्छिमारांच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे नागरिकांच्या आरोग्यावरही याचा विपरीत परिणाम होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत स्थानिक नागरिकांकडून वारंवार तक्रार करूनही महानगरपालिका प्रशासन याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, येथील समस्या सोडविण्याबाबत व समस्यांकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे नाही.

तथापि, सदर प्रकरणी स्थानिक नागरिकांकडून तक्रारी प्राप्त होत असतात ही वस्तुस्थिती आहे.

(३) मालाड (पश्चिम) परिसरातील राठोडी गावही जागा प्रामुख्याने जिल्हाधिकारी, मुंबई उपनगरे व खाजगी मालकीची आहे.

सदर परिसर हा अघोषित झोपडपट्टी सदृश्य असून, सदर ठिकाणचा बहुतांश भाग हा ना-विकास क्षेत्रामध्ये येतो.

सदर परिसरातील नागरिकांच्या समस्या सोडविण्याच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येते :-

- स्वच्छ मुंबई प्रबोधन योजनेच्या माध्यमातून नियमितपणे साफसफाई करण्यात येते.
- घरोघरी जाऊन कचरा संकलन करण्यात येते.
- जमा झालेला कचरा दरदिवशी दोन पाळयांमध्ये उचलण्यात येतो.
- लहान गटारे/नाल्यांची नियमितपणे साफसफाई करण्यात येते.
- सांडपाण्याचा निचरा करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.
- मच्छरांचा प्रादुर्भाव रोखण्याकरिता धूर फवारणी करण्यात येते.
- आरोग्याच्या समस्यांसाठी वैद्यकीय सेवा पुरविण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे येथील राबोडी परिसरात अनैतिक व्यवसाय सुरु असल्याबाबत

**(८०) * ३५३१२ श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील राबोडी परिसरात स्पा आणि मसाज पार्लरच्या नावाखाली कुंटणखाना चालवणाऱ्या स्पा चालकाला अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक पथकाने माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान अटक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार दोषीविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) ऑर्चिड स्पा ॲन्ड सलून, ठाणे पश्चिम येथे वेबसाईटवरील जाहिरातीतील मोबाईल क्रमांकाव्दारे ग्राहकांशी संपर्क साधुन ग्राहकांकडून स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता काही रक्कम स्विकारून बळीत महिलांना ग्राहकासोबत शरीरसंबंध प्रस्थापित करण्यास प्रवृत्त करून त्यांच्याकडून सदर स्पा मध्ये

वेश्याव्यवसाय करवून घेवुन त्यामधुन मिळालेल्या पैशावर स्वत:ची उपजिवीका करीत असल्याचे चौकशीत आढळुन आले आहे. त्यामुळे राबोडी पोलीस स्टेशन येथे गुन्हा र. क्र. ३२/२०१७, अनैतिक व्यापार प्रतिबंधक अधिनियम सन १९५६ चे कलम ३, ४ व ५ प्रमाणे चार आरोपीविरूध्द गुन्हा नोंद करणेत आला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वसई-विरार (जि.पालघर) उपप्रदेशात मोठया प्रमाणात अनधिकृत रिसॉर्ट असल्याबाबत

**(८१) * ३६९९१ श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई-विरार (जि.पालघर) उपप्रदेशात मोठया प्रमाणात अनधिकृत रिसॉर्ट असून रिसॉर्टच्या जलतरण तलावात आतापर्यंत १३ पर्यटकांचा सुरक्षारक्षक नसल्यामुळे बुडून मृत्यू झाल्याच्या घटना घडल्याचे स्थानिक सामाजिक कार्यकर्ते श्री.गोविंद गुंजाळकर यांनी दिनांक २५ सप्टेंबर, २०१७ रोजीच्या पत्रान्वये शासनाच्या निदर्शनास आणले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त तालुक्यातील बहुतेक सर्व रिसॉर्टचे बांधकाम बेकायदेशीर असून तसेच खोटी कागदपत्रे दाखवून शासकीय परवाने मिळवून सुरु करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय.
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्‌नुसार आतापर्यंत किती बेकायदेशीर रिसॉर्टवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

श्री.गोविंद गुजांळकर यांचे दिनांक २५/०९/२०१७ चे पत्र गृह विभागास प्राप्त झाले आहे.

सन २०१६-१७ मध्ये ३ पर्यटकांचा जलतरण तलावात मृत्यू झाला असल्याचे तसेच या प्रकरणी स्थानिक पोलिसांनी गुन्हा दाखल केल्याचे पोलीस अधिक्षक, पालघर यांनी कळविले आहे.

(२) व (३) वसई विरार उपप्रदेशात एकूण ३१ रिसॉर्ट व ६२ व्यावसायिक फार्म हाऊस असे एकूण ९३ फार्म हाऊस / रिसॉर्ट आहेत. यापैकी ३१ रिसॉर्ट/ फार्म हाऊसमध्ये जलतरण तलाव आहेत.

तत्कालीन प्राधिकरण सिडकोने १० रिसॉर्टना परवानगी दिली आहे. वसई विरार उपप्रदेशातील रिसॉर्टना रिसॉर्ट परवानगी संदर्भात कागदपत्रे सादर करण्याच्या सूचना वसई विरार शहर महानगरपालिकेने दिल्या आहेत.

वसई विरार उपप्रदेशतील सर्व रिसॉर्ट/फार्महाऊस यांचे कागदपत्रे तपासणी करण्याकरीता विशेष मोहिम हाती घेण्याचे तसेच अनधिकृत रिसॉर्ट/ फार्महाऊस आढळल्यास त्यांचेविरुध्द कायदेशीर कारवाई करण्याच्या सूचना आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांना देण्यात आल्या आहेत.

तसेच ज्या रिसॉर्टमध्ये जलतरण तलाव आहेत अशा ठिकाणी सुरक्षा व्यवस्थेची खातरजमा करण्याबाबत जिल्हाधिकारी, पालघर यांनी दिनांक ०६/१२/२०१७ रोजीच्या पत्रान्वये अपर पोलीस अधिक्षक, वसई यांना कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील मुंबादेवी मंदिराचा कारभार शासनाच्या अखत्यारित घेण्याबाबत

**(८२) * ३५८१९ श्री.प्रविण दरेकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.विजय उर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मुंबादेवीचे मंदिर मुळचे कोळी समाजाचे असून या मंदिरात येणाऱ्या भाविकांकरिता कोणत्याच सुविधा नाहीत तसेच कोट्यवधीचे उत्पन्न असणाऱ्या या मंदिराकडून सामाजिक भावनेतून कोणतीही लोकोपयोगी कामे होत नसल्याने या मंदिराचा कारभार शासनाच्या अखत्यारित घेण्याची मागणी तेथील स्थानिक लोकप्रतिनिधी व भाविकांनी माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे काय व त्याचे स्वरूप काय आहे,

(३) असल्यास, याबाबत शासनाची भूमिका काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये मुंबईतील मुंबादेवीचे मंदिर शासनाच्या अखत्यारित घेण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी केली आहे.
(२) सध्या मुंबईतील मुंबादेवी मंदिराचे नियंत्रण व व्यवस्थापन धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांच्यामार्फत केले जात आहे.
(३) प्राप्त निवेदनाबाबतची कार्यवाही शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बोरीवली (मुंबई) येथील शताब्दी रुग्णालयात रुग्णांना उंदराने चावा घेतल्याबाबत

**(८३) * ३५८३८ अॅड.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, अॅड.निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बोरीवली (मुंबई) येथील शताब्दी रुग्णालयात दिनांक १ ऑक्टोबर ते १५ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास दोन महिलांच्या डोळयाला तर एकीच्या पायाला उंदराने चावा घेतल्याचा प्रकार निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रुग्ण महिलेच्या डोळयाला उंदराने चावा घेतल्याने सदर महिलेचा डोळा निकामी झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) बोरीवली येथील शताब्दी रुग्णालयात दिनांक ३ ऑक्टोबर, २०१७ रोजी एका महिलेच्या डाव्या डोळयाला व दिनांक ९ ऑक्टोबर, २०१७ एका महिलेच्या उजव्या पायाला उंदराने चावा घेतला ही वस्तुस्थिती आहे.

तथापि, रुग्ण महिलेच्या डोळयाला उंदराने चावा घेतल्याने सदर महिलेचा डोळा निकामी झाला हे खरे नाही.

उंदराने चावा घेतलेल्या महिलांवर बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत त्वरीत औषधोपचार करुन त्यांना घरी पाठविण्यात आले आहे. त्यांच्या जीविताला कोणताही धोका नाही.

(३) सदर रुग्णालयात उंदीर प्रतिबंधक उपाययोजनांच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली/येत आहे :-

- रुग्णालयाच्या परिसरात मुषक संहारक औषध टाकण्यात आले आहे.
- आवश्यक त्या ठिकाणी रॅटगार्ड लावण्यात आले आहेत.
- उंदरांची बिळे बुजवून, उंदीर पकडण्यासाठी पिंजरा व गोंदपट्टी लावण्यात आल्या आहेत.
- रुग्णालयाच्या खिडक्यांना जाळया बसविण्यात आल्या आहेत.
- रुग्णालयाच्या इमारतीचे कृत्रिम छत (फॉल सिलिंग) दुरुस्त करण्यात आले आहे.
- कचरा व उरलेल्या अन्न पदार्थांची विल्हेवाट योग्य प्रकारे लावण्याबाबत समुपदेशन करण्यात आले आहे.
- भंगाराची विल्हेवाट लावण्यात आली आहे.
- रुग्णालयाच्या परिसरातील झाडे-झुडपे कमी करण्यात आली आहेत.
- रुग्णालयाबाहेरील खाण्याच्या गाडयांवर कारवाई करण्याची प्रक्रिया सुरु आहे.
- रुग्णालयातील इमारत बांधणाऱ्या कंत्राटदारास विविध उपाययोजनांचा आढावा घेण्याबाबत सांगण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे महानगरपालिकेतर्फे कर्करोग रुग्णालय उभारण्याबाबत

**(८४) * ३४९५२ ॲड.निरंजन डावखरे : तारांकित प्रश्न क्रमांक ३१७६६ ला दिनांक २ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथे टाटा मेमोरियल सेंटर, परळ, मुंबई या कर्करोग निवारण रुग्णालय संस्थेच्या सहकार्याने ठाणे महानगरपालिकेतर्फे कर्करोग रुग्णांसाठी रुग्णालय उभारण्याचा निर्णय दोन वर्षापूर्वी घेऊन तशी कार्यवाही देखील सुरु केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कर्करोग रुग्णालयासाठी महापालिकेने देऊ केलेल्या कोलशेत येथील सुविधा भूखंडाप्रकरणी क्लोरियंट कंपनीच्या व्यवस्थापकाने माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान मा.उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेवर न्यायालयाने निकाल जाहीर केला आहे काय व त्याचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, न्यायालयीन प्रक्रियेमुळे कोलशेत येथील सदर भूखंडाऐवजी अन्य भूखंड कर्करोग रुग्णालयाकरिता आरक्षित करण्याबाबत ठाणे महानगरपालिकेकडून तपासण्यात येत असलेल्या शक्यतेबाबतची कार्यवाही पूर्ण झाली नसल्याचे दिनांक १ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त रुग्णालयाकरिता भूखंड आरक्षित करण्याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** १) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) टाटा मेमोरियल सेंटर यांनी एप्रिल, २०१५ मध्ये माजिवडे येथील मे.सुरेंद्र इंड्रस्ट्रीज या कंपनीमधील सुविधा भुखंडाच्या क्षेत्राची मागणी केली. तथापि, हा सुविधा भूखंड महानगरपालिकेस प्राप्त होण्यास विलंब होत होता.

सबब, महानगरपालिकेने नोव्हेंबर, २०१५ मध्ये कोलशेत येथील क्लॅरियंट कंपनीच्या विकास प्रस्तावात प्राप्त होणाऱ्या सुविधा भूखंडाचे क्षेत्र देण्याची तयारी दर्शविली. तथापि, या सुविधा भूखंडाबाबत कंपनीने मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. अद्याप या प्रकरणी न्यायालयाने निकाल दिलेला नाही त्यामुळे हा भूखंड कर्करोग रुग्णालयासाठी देता आला नाही.

पर्याय म्हणुन आता महानगरपालिकेने सेक्टर क्र. ६ मौ.कावेसर येथील हॉस्पिटलसाठी आरक्षित भूखंड सूचविला असून या भूखंडावर रुग्णालयाच्या इमारत बांधून देण्याची तयारी दर्शविली आहे. हा प्रस्ताव सहमतीस्तव दिनांक ०७/०७/२०१७ रोजीच्या पत्राने टाटा मेमोरियल सेंटरला पाठविण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अंबरनाथ (जि.ठाणे) येथील नगरपरिषद क्षेत्रात अवैधरित्या बांधकाम होत असल्याबाबत

**(८५) * ३७२०२ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.सुभाष झांबड, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील, श्री.अमरनाथ राजूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.जनार्दन चांदूरकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ (जि.ठाणे) येथील नगरपरिषद क्षेत्रात विकास नियंत्रण नियमावलीचे उल्लंघन करुन इमारतीचे बांधकाम होत असल्यासंदर्भात दाखल केलेल्या अर्जावर अंबरनाथ नगरपरिषद, नगररचना विभागाने दिलेला खुलासा नियमबाहय असल्याबाबत सदर नगरपरिषदेच्या नगरसेवकांनी प्रधान सचिव, नगरविकास विभाग यांना दिनांक १३ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय, तदनुसार नियमबाहय बांधकामाबाबत संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

स्थानिक नगरसेवकाचे दिनांक १३/१०/२०१७ रोजीचे प्रधान सचिव, नगरविकास विभाग (नवि-२) यांना अग्रेषित केलेले निवेदन प्राप्त झाले आहे.

(२) या प्रकरणी संचालक, नगरपालिका प्रशासन, वरळी, मुंबई यांना शासनाच्या दिनांक ३१/१०/२०१७ च्या पत्रान्वये उक्त निवेदन उचित कार्यवाहीकरीता पाठविले आहे. कार्यवाहीबाबतचा अहवाल त्यांचेकडून मागविण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मुद्रणालय, नागपूर.